रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २९६
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १५ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

आदिवासी विद्यार्थिनीची यूकेतील विद्यापीठात निवड/२
आमणोली गावाकडे जाणारा प्रवासी पूल कोसळला/५
रायगडात ४३४५ विद्यार्थ्यांना आरटीई प्रवेशाची लॉटरी/८

## राज्यातील १८३ तालुक्यांमध्ये पारा ४५ अंशांवर



**मुंबई :** मे महिन्याचा पंधरवडा उलटत असतानाच राज्याला उन्हाच्या तीव्र झळांनी वेढले आहे. अवघ्या आठ दिवसांपूर्वी केवळ २१ तालुक्यांपुरती मर्यादित असलेली ही 'हीट वेव्ह' आता तब्बल १८३ तालुक्यांपर्यंत विस्तारली असून राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पुढे गेला आहे. गुरुवारी (दि.१४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आपत्ती व्यवस्थापन विभागाने सादर केलेल्या आकडेवारीतून राज्यावरील या अस्मानी संकटाची भीषणता समोर आली आहे. राज्यात ५ ते १४ मे या कालावधीत उष्णतेची लाट सातत्याने तीव्र होत असल्याचे सादरीकरणात नमूद करण्यात आले. ११ मे रोजी १६ जिल्ह्यांतील ५१ तालुक्यांमध्ये ४५ अंश तापमानाची नोंद झाली होती, मात्र त्यानंतर अवघ्या दोन दिवसांत हा आकडा १८३ तालुक्यांपर्यंत पोहचला आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अमृत महोत्सवी अभीष्टचिंतन सोहळा उदंड उत्साहात ▌ रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या इमारतीचे उद्घाटन




(अधिक छायाचित्रे पान ६ व ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामान्य माणसाने असामान्यत्वाच्या शिखरावर कसे पोहचावे याचे तेजस्वी उदाहरण म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास होय. संघर्ष, कष्ट, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेच्या बळावर एखादा व्यक्ती जनमानसाच्या हृदयावर अधिराज्य गाजवू शकतो हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उलवे नोड येथे काढले.

गोरगरिबांचे आधारस्तंभ, सर्व समाजाचे प्रेरणास्थान, थोर दानशूर व्यक्तिमत्व आणि जनसामान्यांच्या हक्कासाठी आयुष्यभर कार्यरत राहिलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सत्कार तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संचलित रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या नवीन अत्याधुनिक इमारतीचा उद्घाटन सोहळा बुधवारी (दि. १३) उलवे नोड येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत भव्य, दिव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, प्रशासकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक, वैद्यकीय आणि विधी क्षेत्रातील हजारो मान्यवर, हितचिंतक आणि जनसागराच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे हा सोहळा ऐतिहासिक ठरला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, पुष्पगुच्छ, चाफ्याच्या फुलांची परडी आणि सन्मानचिन्ह देऊन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले. यासोबतच अनेक मान्यवर, हितचिंतक, नागरिकांनी उपस्थित राहून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याविषयीचा आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली.

उलवे नोड सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर झालेल्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, सांस्कृतिकमंत्री ॲड.आशिष शेलार, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी, फलोत्पादन व खारजमीन विकासमंत्री भरत गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगडचे खासदार सुनील तटकरे, मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार दिलीप वळसे-पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार मंदा म्हात्रे, आमदार महेंद्र दळवी, आमदार विक्रांत पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार पंडित पाटील, माजी आमदार देवेंद्र साटम, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते व समितीचे कार्याध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, जिल्हाधिकारी किशन जावळे, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संचालक व नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, उरणचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, पनवेल महापालिकेचे सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, जेबीएसपी संस्थेचे संचालक संजय भगत, जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणजे विकासाचे कणखर नेतृत्व : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी, या परिसरात भाजपची ताकद नगण्य होती, पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामुळे भाजपचा रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे अधोरेखित करून लोकनेते रामशेठ ठाकूर हे केवळ उद्योजक नसून भूमिपुत्रांच्या हक्कासाठी लढणारे आणि विकासाला गती देणारे कणखर नेतृत्व आहेत, अशा शब्दांत त्यांचा गौरव केला.

## निवडक

### केंद्र सरकारकडून साखर निर्यातीवर बंदी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातल्याचा निर्णय घेतला. १३ मे रोजीपासून ३० सप्टेंबरपर्यंत ही बंदी लागू असल्याचे सरकारने अधिसूचना जारी करून सांगितले. देशांतर्गत पुरवठा आणि किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. तथापि, सध्या प्रत्यक्ष निर्यातीच्या प्रक्रियेत असलेल्या साखरेच्या साठ्यांनाही हा निर्णय लागू होत नाही.

### श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय संघात वैभव सूर्यवंशीची एन्ट्री!

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आगामी श्रीलंका दौऱ्यावरील एकदिवसीय तिरंगी मालिकेसाठी 'इंडिया-ए' संघाची घोषणा केली आहे. या संघात अनेक युवा खेळाडूंना संधी देण्यात आली असून १५ वर्षीय डावखुरा सलामीवीर फलंदाज वैभव सूर्यवंशीची निवड हे या निवडीचे मुख्य आकर्षण ठरले आहे. या मालिकेसाठी अष्टपैलू खेळाडू तिलक वर्माकडे नेतृत्व सोपवण्यात आले असून रियान पराग उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे.

## महाराष्ट्रासह १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशात एसआयआर मोहीम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह देशातील १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष मतदार यादी सुधारणा (एसआयआर) मोहिम राबवण्याची घोषणा केली आहे. या प्रक्रियेला २० मेपासून सुरुवात होणार असून महाराष्ट्रात ही मोहीम २० जूनपासून सुरू करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबवली जात आहे. या प्रक्रियेदरम्यान नव्या मतदारांची नोंदणी, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे तसेच मतदारांच्या तपशीलातील दुरूस्त्या करण्यात येणार आहेत.

विविध राज्यांचे स्वतंत्र वेळापत्रक आहे. १९पैकी शेवटच्या राज्याची प्रक्रिया २३ डिसेंबर रोजी पूर्ण होईल. या विशेष मोहिमेअंतर्गत महाराष्ट्रात ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर दावे आणि हरकती स्वीकारण्याची प्रक्रिया पार पडेल. सर्व सुनावण्या आणि पडताळणीनंतर महाराष्ट्रात ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाणार आहे.

**कोणकोणत्या ठिकाणी होणार 'एसआयआर'?**

एसआयआर प्रक्रिया महाराष्ट्रसह ओडिशा, मिझोरम, सिक्कीम, मणिपूर, दादरा नगर हवेली आणि दीव दमण, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, चंदीगड, तेलंगणा, पंजाब, कर्नाटक, मेघालय, झारखंड, दिल्ली, नागालँड, त्रिपुरा अशा १६ राज्यांमध्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये होणार आहे. त्यासाठी प्रशासन सज्ज होत आहे.

## शासकीय कार्यक्रमांच्या अवास्तव खर्चाला ब्रेक!

### मुख्यमंत्र्यांचा निर्णय; पुढील सहा महिने एकही मोठा सरकारी सोहळा होणार नाही

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्भवलेल्या इंधन तुटवड्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व मोठे शासकीय कार्यक्रम पुढील सहा महिन्यांसाठी स्थगित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. "केवळ उपदेशाचे डोस न पाजता नेत्यांनी स्वतः कृतीतून आदर्श ठेवला पाहिजे, तरच तो लोकांपर्यंत पोहचतो," अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाचे समर्थन केले आहे.

विधान परिषदेतील नवनिर्वाचित १० आमदारांच्या शपथविधीसाठी गुरुवारी (दि.१४) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चक्क बुलेटवरून विधान भवनात दाखल झाले. त्यांच्या मागे मंत्री आशिष शेलारही स्वार झाले होते. इंधन बचतीचा संदेश प्रतीकात्मक पद्धतीने लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी हा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यावर टीका करणाऱ्या विरोधकांना 'बिनडोक' आणि 'अप्रगल्भ' म्हणत जोरदार निशाणा साधला. "पंतप्रधानांचे परदेश दौरे हे देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि धोरणात्मक दृष्टीने आवश्यक असतात. अशा दौऱ्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे हे मूर्खपणाचे लक्षण आहे," अशी टीका त्यांनी केली.



पुढील सहा महिने सरकारी कार्यक्रम होणार नसले तरी शुक्रवारी साताऱ्यात होणारा कार्यक्रम नियोजित वेळापत्रकानुसार पार पडेल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. "साताऱ्याच्या कार्यक्रमाचे नियोजन आधीच झाले असून त्यावर खर्चही झाला आहे. या कार्यक्रमाद्वारे २५ लाख कुटुंबांना १० हजार कोटी रुपयांचा लाभ प्रधानमंत्री आवास योजनेतून दिला जाणार आहे. त्यामुळे हा कार्यक्रम रद्द करणे योग्य नव्हते, मात्र यानंतर पुढील सहा महिने खर्चात कपात करण्याच्या उद्देशाने कोणतेही मोठे सोहळे आयोजित केले जाणार नाहीत," अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**विरोधकांमध्ये प्रगल्भतेची उणीव**

*यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जगातील सर्व देश आज कठोर निर्णय घेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्याला केवळ थोडासा त्याग करायला सांगितला आहे. यापूर्वी इंदिरा गांधी आणि २०१२मध्ये पी. चिदंबरम यांनीही असे निर्णय घेतले होते. देशहितासाठी आपण थोडेही जुळवून घेणार नसू, तर ती विरोधकांच्या प्रगल्भतेची उणीव आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.*

## रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचा सायकलवरून कार्यालयापर्यंत प्रवास



**अलिबाग : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधनाचा वापर कमी करण्याचे आवाहन केल्यानंतर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल गुरुवारी (दि. १४) सकाळी घरून शासकीय वाहनाऐवजी सायकलवरून कार्यालयात दाखल झाल्या.

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन वापर कमी करण्याचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ऊर्जाबचतीचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत पोलीस अधीक्षक आंचल दलाल गुरुवारी सकाळी सायकल चालवत कार्यालयात आल्या. यासोबत काही कर्मचाऱ्यांनीही पुढील काळात सायकलचा वापर वाढवण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, नागरिकांनीदेखील पोलीस अधीक्षकांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

## विधान परिषदेच्या नवनिर्वाचित १० सदस्यांचा शपथविधी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधान परिषदेच्या १० जागांसाठी बिनविरोध निवडून आलेल्या सर्व सदस्यांना सभापती प्रा.राम शिंदे यांनी गुरुवारी (दि. १४) सदस्यत्वाची शपथ दिली. विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात हा शपथविधीचा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोड, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, आमदार रवींद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, अंबादास दानवे, डॉ. प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, झिशान सिद्धीकी, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे आणि संजय भेंडे या १० सदस्यांनी शपथ घेतली. यावेळी सभापती प्रा. राम शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित विधान परिषद सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्याचबरोबर अन्य मान्यवरांनी नव्या सदस्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## यूपीत अवकाळी पावसाचा हाहाकार!

### सुमारे १०० जणांचा मृत्यू, मालमत्तेचेही नुकसान

**प्रयागराज : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमध्ये पावसाने हाहाकार माजवला आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसात सुमारे १०० जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात अनेक ठिकाणी झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडले असून घरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदतीची घोषणा केली आहे. एवढेच नव्हे तर २४ तासांच्या आत ही मदत संबधित कुटुंबियांना मिळावी, असे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

उत्तर प्रदेशला बुधवारी मुसळधार पावसाने झोडपले. पावसासह आलेल्या वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या. पावसाचा सर्वाधिक फटका प्रयागराजला बसला असून या ठिकाणी २१ जणांचा मृत्यू झाला आहे.

बरेलीच्या बमियाना गावात वादळी वाऱ्यामुळे पत्र्याच्या शेडसोबत एक व्यक्ती हवेत ५० फूट उंच उडून शेतात फेकला गेला. नन्हे मियाँ असे या व्यक्तीचे नाव असून या अपघातात त्यांचे हात-पाय फ्रॅक्चर झाल्याची माहिती समोर आली आहे.

# महाराष्ट्रात १.१४ लाख कोटींची गुंतवणूक; ८,००० जणांना मिळणार रोजगार!

**मुंबई : प्रतिनिधी**

औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' समवेत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार आज झाला.



मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या कराराच्या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एएम इंटेलिजन्स लॅब्जचे अध्यक्ष अनिल चलमलाशेट्टी, संचालक मौर्य पायदा, उपाध्यक्ष पंकज कुमार आदी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात तब्बल ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

या सामंजस्य करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात (MMR) 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी १,१४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल.उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे.

यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डेटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स टीमचा समावेश असेल. प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत सुमारे २ हजार अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

हा प्रकल्प ५०० मेगावॅट क्षमतेचा असून यामध्ये २,५०,००० उच्च क्षमतेचे 'एआय चिपसेट्स' वापरले जातील. तसेच या प्रकल्पाचा दोन टप्प्यांत विकास करण्यात येईल. २०० मेगावॅट क्षमतेचा पहिला टप्पा सन २०२८ पर्यंत तर ३०० मेगावॅट क्षमतेचा दुसरा टप्पा २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

हा प्रकल्प राज्याच्या माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ तसेच हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क धोरण २०२४ अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात राष्ट्रीय व जागतिक स्तरावर अग्रस्थानी नेण्याचा उद्देश या प्रकल्पामागे आहे.

## रोह्यातील आदिवासी विद्यार्थिनीची यूकेतील नामांकित विद्यापीठात निवड

**माणगाव : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील कोलाड-चिंचवली येथील कातकरी समाजातील विद्यार्थिनी सपना राजेश वाघमारे हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उच्च शिक्षणासाठी युनायटेड किंग्डममधील नामांकित विद्यापीठांमध्ये निवड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आदिवासी विकास विभागाच्या ग्लोबल स्कॉलरशिप प्रोग्रॅम अंतर्गत तिची University of Leeds तसेच Queen Mary University of London येथे निवड झाली आहे.

सपना वाघमारे ही आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव यांच्या अधिपत्याखालील आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृह, हडपसर (पुणे) येथे शिक्षण घेत होती. अत्यंत दुर्गम भागातून येणाऱ्या सपनाने आर्थिक अडचणी, प्रतिकूल परिस्थिती आणि सामाजिक आव्हाने यांवर मात करत हे यश मिळविले आहे.

मोलमजुरी करून मुलीला शिक्षण देणाऱ्या तिच्या पालकांसाठी तसेच संपूर्ण आदिवासी विकास विभागासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे. मुलीने जागतिक स्तरावर शिक्षणासाठी झेप घेतल्याने कुटुंबीयांसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## प्रतिनियुक्तीवर असलेल्या राजिपच्या कर्मचाऱ्यांना मूळ ठिकाणी हजर राहण्याचे आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदचे (राजिप) जे कर्मचारी प्रतिनियुक्तीवर आहेत आशय ४५ कर्मचाऱ्यांना मुळ नेमणूक असलेल्या कार्यालयात परत हजर होण्याआदेश रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी दिले आहेत.

रायगड जिल्हा परिषदेतील कर्मचारी गेल्या काही वर्षापासून विविध ठिकाणी प्रतिनियुक्तीवर आहेत. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांवर त्यांच्या कामाचा प्रभार देण्यात आला आहे. त्याचा कामाचा ताण कर्मचाऱ्यांवर पडतो. राजिपचे ११ कर्मचारी राज्यसरकारकडे प्रतिनियुक्तीवर आहेत. १३ कर्मचारी हे कोकण विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर प्रतिनियुक्तीवर आहेत. २१ कर्मचारी हे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीस्तरावर इतर विभागात प्रतिनियुक्तीवर आहेत. या सर्वांची लवकरच मूळ नियुक्तीच्या ठिकाणी यावे लागणार आहे. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी प्रतिनियुक्तीवर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना मूळ नेमणूक असलेल्या कार्यालयामध्ये हजर राहण्याचे आदेश दिले. त्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये प्रतिनियुक्तीवर २१ कर्मचाऱ्यांना मुळ नेमणूक असलेल्या ठिकाणी हजर होण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. जे कर्मचारी राज्यशासनाकडे आणि कोकण आयुक्तांत प्रतिनियुक्तीवर आहेत त्या कर्मचाऱ्यांना परत पाठवण्याची विनंतीपत्र संबंधित कार्यालयांकडे पाठवविण्यात आले आहे. बरेचदा कर्मचारी राजकीय आणि प्रशासकीय वजन वापरून सोयीच्या ठिकाणी प्रतिनियुक्तीवर जातात. मुळ नेमणूक झालेल्या ठिकाणी हे कर्मचारी काम करत नाहीत त्यांच्या कामाचा भार इतर कर्मचाऱ्यांना सोसावा लागतो. प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्माचाऱ्या पगार आणि इतर लाभ या कर्चचाऱ्याची मूळ नेमणूक असलेल्या ठिकाणीच सुरू असतात. त्यामुळे जिल्हा परिषदेचे कामावर परिणाम होतो. तसेच हे कर्मचारी प्रति नियुक्तीवर गेल्याने मूळ नेमणूक असलेल्या जागा रिक्त राहतात. तिथे नवीन कर्माचाऱ्याची नियुक्ती करता येत नाही.

> ***जिल्हा परिषदेतील काही कर्मचारी विविध ठिकाणी प्रतिनियुक्तीवर आहेत. अशा सर्व कर्मचाऱ्यांना त्यांची नेमणूक असलेल्या मूळ ठिकाणी परत बोलवा असे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.***
>
> ***-मंगेश वाकडीकर, अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद***

## भारत-आफ्रिका संबंध दृढ करण्यासाठी महाराष्ट्राचा पुढाकार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सिडको आणि एआयईएफ यांच्या दरम्यान आफ्रिका भारतआंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र विकसित करण्यासाठी विशेष वाहन हेतू कंपनी स्थापन करण्याकरिता करारभारत-आफ्रिका संबंध दृढ करण्यासाठी महाराष्ट्राचा पुढाकार - १४ मे २०२६ रोजी सिडको व एआयईएफ यांच्या दरम्यान आफ्रिका भारत आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र विकसित करण्यासाठी विशेष वाहन हेतू कंपनीस्थापन करण्याकरिता करार झाला

सिडको आणि आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाउंडेशन (एआयईएफ) यांनी दि. १४ मे २०२६ रोजी मंत्रालय,मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री. एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत आफ्रिका भारत आंतरराष्ट्रीयविकास क्षेत्र विकसित



करण्याकरिता करारावर स्वाक्षऱ्या करून आदान-प्रदान करण्यात आले.

या प्रसंगीश्री. असीम गुप्ता, अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास; विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीयसंचालक, सिडको; . शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको डॉ. जी. रथिनवेलू, अध्यक्ष,आफ्रिका इंडिया ईकॉनॉमिक फाऊंडेशन, श्री. टी. एस. तिरुमूर्ती, राजदूत व संयुक्त राष्ट्रसंघ, न्यूयॉर्क येथीलभारताचे माजी स्थायी प्रतिनिधी यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सिडकोतर्फे आफ्रिका भारत व्यापार केंद्र (एआयबीसी) नवी मुंबई येथे प्रस्तावित असून भारत व आफ्रिकनराष्ट्रांमधील आर्थिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे एकात्मिक केंद्रम्हणून हा प्रकल्प संकल्पित आहे. द्वीपक्षीय व्यापार, गुंतवणूक आणि संस्थात्मक भागीदारी यांना चालना देण्याच्या उद्देशाने आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाउंडेशन (एआयईएफ) यांच्या सहयोगाने हा प्रकल्पआकारास येणार आहे. ग

भारत-आफ्रिकेतील सध्याच्या ९६ अब्ज अमेरिकन डॉलर भागीदारीच्या क्षमता अधिक वाढीस लागाव्यायाकरिता हा प्रकल्प महत्त्वाचा आहे.आफ्रिका भारत व्यापार केंद्र हा परिवर्तन घडवून आणणारा प्रकल्प असून याद्वारे भारत-आफ्रिका संबंधांचे प्रमुख जागतिक केंद्र म्हणून महाराष्ट्र उदयास येणार आहे.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उलवे परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेल्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या अत्याधुनिक इमारतीचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. प्रशस्त वर्गखोल्या, सुसज्ज प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षणसुविधा, आधुनिक क्रीडांगण आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीमुळे ही संस्था परिसरातील शैक्षणिक क्षेत्रासाठी नवी दिशा ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

याचबरोबर लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास, संघर्ष, सामाजिक कार्य आणि राजकीय वाटचालीचा आणि कार्याचा गौरव करणाऱ्या व विस्तृत आढावा घेणाऱ्या 'रामपर्व' या विशेष पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या सोहळ्यात करण्यात आले. या क्षणी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करत आनंद व्यक्त केला.

आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज आपण करत असलेला हा सत्कार केवळ एका व्यक्तीचा सत्कार नाही; तर सामान्य माणसामध्ये दडलेल्या असामान्य शक्तीचा, जिद्दीचा आणि समाजाप्रती समर्पणाच्या भावनेचा गौरव आहे. आपल्या यशाचे शिखर गाठल्यानंतरही ज्याने आपल्या मातीशी, आपल्या संस्थेशी आणि आपल्या लोकांशी असलेली नाळ जपली, त्या व्यक्तिमत्त्वाला अभिवादन करण्याचा हा सुवर्णक्षण आहे. ज्या रयत शिक्षण संस्थेने त्यांना घडवले, संस्कार दिले, जीवनाला दिशा दिली; त्या मातृसंस्थेला आजवर तब्बल १३५ कोटी रुपयांहून अधिक रकमेची गुरुदक्षिणा अर्पण करून त्यांनी आधुनिक काळातील एकलव्य ही ओळख अक्षरशः सार्थ ठरवली आहे. ही केवळ देणगी नाही, तर शिक्षण, संस्कार आणि गुरूऋणाप्रती असलेली त्यांची अथांग कृतज्ञता आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या जवळपास अनेक प्रमुख इमारती, शाळा असतील, कॉलेजेस असतील याला सढळ हाताने त्यांनी मदत केली. एकही वर्ष असे जात नाही की ज्यावर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर रयत शिक्षण संस्थेला त्या ठिकाणी आपली मदत देत नाहीत, त्यामुळे एकलव्याप्रमाणे आपली गुरूदक्षिणा गुरूने न मागता देणारे असा प्रकारचे रामशेठ ठाकूर आहेत आणि हे आपल्याला खरोखर अतिशय प्रेरणा देणारे आहे तसेच त्यांचा प्रवासदेखील थक्क करणारा आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्र्यांनी पुढे म्हटले की, साधी नोकरी करत असताना त्यांना सिडकोचे १० हजार रुपयांचे काम करण्याची पहिली संधी मिळाली. या कामासाठी त्यांनी घरचे दागिने गहाण टाकले, पेढीवरून पाच हजार उचलले आणि पहिल्यांदा ते काम केले व पहिल्या कामामध्ये त्या ठिकाणी अडीच हजार रुपये नफा कमवला. ज्यावेळी साडेचारशे रुपये पगार होता, त्यावेळी अडीच हजारांचा नफा कमवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या लक्षात आले की नोकरी तर करायचीच आहे, पण मोठे व्हायचे असेल तर हे कामही करावे लागेल आणि मग ५० हजार रुपयांचे काम, एक लाखांचे काम असे करता-करता ते आपले काम वाढवत गेले. ज्यावेळी सिडकोने त्या काळात एक कोटी रुपयाचे काम काढले त्या वेळी फक्त मोठे कंत्राटदार हे एक कोटींचे काम करू शकणार होते, मग लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिडकोच्या विरुद्ध जाऊन एक मोठे आंदोलन उभारले आणि सांगितले याचे पार्ट करा. हे काही एक काम नाही आहे, याचे पार्ट करु शकता आणि इथल्या सगळ्या भुमिपूत्रांना एकत्रित करून सगळ्यांना थोडे थोडे काम देऊन ते काम त्या ठिकाणी पूर्ण केले आणि त्यातून भूमिपुत्र कशा पद्धतीने काम करू शकतो हे त्यांनी दाखवून दिले.

सिडको आली तेव्हा सिडकोला विरोध खूप होता. कोणी ऑफिस द्यायला तयार नव्हते. रामशेठ ठाकूर यांनी सांगितले, माझ्याकडे ऑफिस सुरू करा. त्यांच्याकडे ऑफिस सुरू झाले. त्याच्यावर मोठा मोर्चा त्या काळात गेला. तो मोर्चा गेल्यानंतर रामशेठ ठाकूर यांनी सांगितले मोर्चा याकरिता आला की तुम्ही आमच्या स्थानिकांना नोकऱ्या दिल्या नाहीत. त्याच ठिकाणी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, आम्ही स्थानिकांना नोकऱ्या देतो आणि तिथल्या तिथे स्थानिकांना नोकऱ्या मिळाल्या. तेथून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपला संघर्ष सातत्याने पुढे नेला. ज्यावेळी मोठे काम जेएनपीटी पोर्टचे निघाले तोपर्यंत कंपनी बऱ्यापैकी स्थापन झाली होती, खूप मोठे काम होते आणि गणेश नाईकसाहेबांनी आपल्या मुलाला त्या ठिकाणी पाठवले व सांगितले की, मोठे काम आले आहे आणि हे काम रामशेठ ठाकूर हेच करू शकतात, रामशेठने ते काम करावे. त्यावेळी रामशेठ ठाकूर विदेशात होते. त्यांना विदेशात फोन लावला, ते म्हणाले मी हे काम करीन आणि मग त्यावेळी पोर्टचे मोठे त्या काळचे जेवढे मोठे मोठे कंत्राटदार होते त्या सर्वांना मागे टाकून वेळेत काम पूर्ण करण्याचे त्या ठिकाणी काम हे रामशेठ ठाकूरांनी करून दाखवले आणि त्यातून ही जी कंपनी आज इतकी मोठी आपल्याला पहायला मिळते ती कंपनी त्यांच्या मेहनतीतून व जिद्दीने उभी करुन दाखविली आणि भुमिपुत्रदेखील काम करू शकतात तेही उत्तम व जिद्दीने उभी करून दाखविली. भुमिपूत्रदेखील काम करू शकतात, तेही उत्तम काम करू शकतात हे दाखवण्याचे काम खऱ्या अर्थाने रामशेठ ठाकूर यांनी केले, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

एकीकडे स्वतःचा व्यवसाय सुरू होता, त्यासोबत स्व.दि.बा.पाटीलांसोबत वेगवेगळ्या आंदोलनामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर त्या ठिकाणी सहभागी होते. ८०च्या दशकामध्ये फार काही कायदे नव्हते. कोणाचीही जमीन उचलली की ती घेऊन टाकायची, त्याच्यावर सरकारने नाव लावून टाकायचे, त्यांना काही मिळाले, तर ठीक, नाही मिळाले तर ठीक तुम्ही लढत रहा, अशा पद्धतीने या परिस्थितीमध्ये त्या ठिकाणी स्व.दि.बा.पाटील यांच्या नेतृत्वामध्ये भूमिपुत्रांचा जो लढा झाला त्यात अतिशय प्रमुख भूमिका लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी निभावली आणि टप्याटप्याने प्रत्येक आंदोलनामध्ये भुमिपुत्रांना त्यांचे हक्क मिळत गेले. जमिनी मिळाल्या, साडेबारा टक्केचा निर्णय झाला, घरांचा निर्णय झाला, नोकऱ्यांचा निर्णय झाला, व्यवसायाचा निर्णय झाला अशा वेगवेगळ्या गोष्टी सातत्याने संघर्षाची फार मोठी गाथा ही लोकनेते रामशेठ ठाकूरांची आहे आणि त्यामुळे भुमिपुत्रांनी त्यांना थेट लोकसभेमध्येच पाठवून दिले. हा असा नेता आहे की जो डायरेक्ट लोकसभेपर्यंत पोहचला आणि दोन्ही लोकसभेच्या निवडणुकीमध्ये दिग्गजांना त्या ठिकाणी पराभूत करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. ते असे व्यक्ती आहेत, ज्यांनी ५१-५२व्या वर्षी घोषित करून टाकले की आता मला राजकारणात राहायचे नाही, मी निवडणूक लढणार नाही, खरं म्हणजे अनेक निवडणूक ते जिंकू शकले असते, पण त्यांनी निर्धार केला, निर्णय केल्यानंतर मागे वळून बघितले नाही आणि सातत्याने समाजकार्य ते करीत राहिले. रायगड जिल्ह्यातील, नवी मुंबईच्या भागातील सर्व विकासामध्ये त्यांचे योगदान आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

आता तर पुढच्या काळामध्ये आपले सरकार मुंबईपेक्षा सुंदर मुंबई या रायगड जिल्हा व नवी मुंबईमध्ये साकारणार आहेत. खरी पुढची मुंबई इथेच होणार आहे. या क्षेत्राचा इतिहास लिहिला जाईल त्या इतिहासामध्ये ठळकपणे जी नावे लिहिली जातील त्यातले एक नाव हे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे असेल, असे शेवटी मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्याचा गौरवही केला. संयमी, शिस्तबद्ध आणि लोकांसाठी काम करणारा लोकप्रतिनिधी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन कार्याचा आलेख मांडला. आजची उपस्थिती पाहून त्यांच्यावर मनापासून व हृदयावर प्रेम करणारे कार्यकर्ते पहायला मिळाले. कर्तृत्व, नेतृत्व यांचा अनोखा संगम रामशेठ ठाकूर यांच्या जीवनात पहायला मिळतो. गाव, गरीब माणूस, शेतकरी, कामगार यांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी; त्याचबरोबर स्थानिकांना रोजगार मिळविण्यासाठी रामशेठ ठाकूर यांनी आपले आयुष्य खर्च केले, असे त्यांनी सांगितले.

१९९५च्या काळात कंत्राटदारांनी अर्धवट सोडलेली मुंबई-पुणे एक्सप्रेस वे आणि उड्डाणपुलांची कामे रामशेठ ठाकूर यांच्या धाडसी सहकार्यामुळेच पूर्ण होऊ शकली, अशी आठवण सांगून मंत्री गडकरी म्हणाले की, रामशेठ ठाकूर यांनी जेएनपीटी आणि सिडकोच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना रोजगार मिळवून देण्यासाठी मोठा संघर्ष केला. विकासाची फळे स्थानिक माणसापर्यंत पोहचली पाहिजेत हा त्यांचा विचार मोलाचा आहे. त्यांनी कामात कधीही बेईमानी केली नाही त्यामुळे राजकारणाच्या पलीकडे जाऊन रामशेठ ठाकूर हे लोकनेता झाले. आज देशामध्ये पैसेवाले कमी नाहीत, पण देण्याची वृत्ती फार थोड्या लोकांमध्ये आहे. रामशेठ ठाकूर यांच्याकडे ती दानत मोठ्या प्रमाणात आहे. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान फार मोठे आहे. असंख्य विद्यार्थ्यांना त्यांनी आर्थिक मदत केली आहे. ते कॉंट्रक्टर जरूर आहेत, पण सर्व प्रथम त्यांना भूमिपुत्रांची काळजी आहे. रामपर्व ही जीवनाची सुरुवात आहे आणि शतायुषी होईपर्यंत हे रामपर्व युग असाच चालत राहिल, असा विश्वास मंत्री गडकरी यांनी व्यक्त केला.

आज सत्तेच्या खुर्चीला फारच चिकटून बसतात. नगरसेवकाला आमदार व्हायचे असते, आमदाराला मंत्री व्हायचे असते, मंत्र्यांना मुख्यमंत्री व्हायचे असते. असे अतृप्त असणे आजच्या राजकारणात पहायला मिळते, मात्र दोन वेळा खासदार होऊनही वयाच्या ५२व्या वर्षी राजकारणातून निवृत्त होणारे रामशेठ ठाकूर यांचा आदर्श सर्वच राजकारण्यांनी घ्यावा, असे नमूद करतानाच त्यांचा १००वा वाढदिवस याच मैदानावर व्हावा, असा विश्वास व्यक्त करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या यशामध्ये त्यांच्या धर्मपत्नी शकुंतलाताई ठाकूर, चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांचेही योगदान असल्याचा आवर्जून उल्लेख ना. गडकरी यांनी केला.

सत्कारमूर्ती लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, माझ्यावर प्रेम करणारी सर्व मंडळी आहेत, त्यामुळेच मी मोठा झालो आहे. ७५ वर्ष पूर्ण झाली, या ७५ वर्षात अनेक बरे-वाईट अनुभव आले. १० हजारांचे काम, १२ हजारांचे काम, गाढवावर माती वाहून नेण्याचे काम ही सगळी कामे केली आणि त्याबरोबर काम मिळत नाही म्हटल्यानंतर मी झगडलोसुद्धा. १९८१चे आंदोलन, ८४चे आंदोलन यामध्ये सहभाग घेतला. ८१चे आंदोलन ज्यावेळी जासई नाक्यावर झाले. भगतसाहेबांचं डोकं फुटलं, श्रावणशेठ कोळी, आदरणीय दि.बा. पाटीलसाहेबांना मार बसला. त्यावेळेला मी आंदोलनात होतो आणि ८४च्या आंदोलनात ज्येष्ठ नेतेमंडळींना तुरुंगात डांबले गेले आणि पाटीलसाहेबांनासुद्धा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेव्हा ८४चे आंदोलन पुढे नेण्याकरिता नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली. मी, दशरथ ठाकूर, बी.के. ठाकूर आणि भारती पोवार त्या वेळेला नेतृत्व करून ते ८४चे आंदोलन आम्ही पुढे नेले. लोकांच्या आशीर्वादाने, सहकार्याने त्यात आम्ही यशस्वी झालो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपले पुत्र आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांच्या कर्तृत्वाचा प्रामुख्याने उल्लेख केला. आपले सर्वांचे सहकार्य; त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मान्यवरांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन यामुळे पुढील १०-२० वर्षे काम करण्याची उर्जा मिळाल्याचा उल्लेख केला. आयुष्यात जे आपण काम करत असतो त्यांची नोंद आणि दखल ही घेतली जात असते. त्यातून आज आपल्या सर्वांचे सहकार्य आणि प्रेमामुळे येथपर्यंत पोहचलो आहे. काम करत असताना गावागांवातील लोकांना सोबत घेऊन काम करत राहिलो. त्यामुळे स्वतःबरोबर लोकांचेपण भले झाले. लोकांचे सहकार्य मिळाले. त्यातूनच या परिसरात प्रकल्प उभे राहून विकास झाला आणि स्थानिक भूमिपुत्रालादेखील त्यांचे हक्क मिळाले, याचाही त्यांनी उल्लेख केला.

या सोहळ्याचे प्रास्ताविक लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी यांनी केले. त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाचा जीवनपट उलगडला. त्याचबरोबर रामशेठ यांच्या परिस्पर्शाने दगडाचेही सोने होते, त्यामुळेच माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता दोन वेळा आमदार झाल्याची प्रांजळ कबुली दिली. उपस्थितांचे आभार जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर यांनी मानले.

दरम्यान, सोहळ्यापूर्वी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी मुख्यमंत्री शरदचंद्र पवार आणि त्यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई पवार यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन त्यांचे अभीष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या.

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, प्रशासकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक, वैद्यकीय आणि विधी क्षेत्रातील मान्यवर नागरिकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण सोहळ्याला अभूतपूर्व उंची प्राप्त झाली. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सोहळा यशस्वी केला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित हा भव्य सोहळा समाजसेवा, शिक्षणप्रेम, सामाजिक ऐक्य आणि लोकहिताचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.

# पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा गुरुवार, दिनांक १४ मे रोजी मुख्यालयात बैठक कक्षात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजूरी देण्यात आली. यावेळी स्थायी समितीचे सर्व सदस्य, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, उपसचिव अक्षय कदम तसेच महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे सेक्टर-३२ येथील ८५ एम.एल.डी. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्राचे सिडकोने नियुक्त केलेले ठेकेदारामार्फत परिचालन, देखभाल, दुरुस्ती पनवेल महानगरपालिकेमार्फत नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत वाढीव मुदतवाढ मिळणेबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली. पनवेल महानगरपालिकेकरीता २० नग फिरते स्वच्छतागृह/मोबाईल टॉयलेट ३ वर्षाच्या वॉरंटी सह खरेदी करणे (२ nd call) या कामाच्या न्युन्नतम दराची निविदा मंजुर करण्याचा विषय स्थिगित करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती क मधील सर्व सार्वजनिक कार्यालयांमधील शौचालयांचे सुशोभिकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामी न्युनतम दराची निविदा मंजुर करण्याच्या विषय स्थगित करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या कामोठे नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलुन नविन एलईडी पथदिप लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या नविन पनवेल (पूर्व व पश्चिम) व काळुंद्रे नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलुन नविन एलईडी पथदिप लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबतच्या विषयास समितीने मंजूरी दिली.

पनवेल महानगरपालिका हद्दीत उद्यांनामध्ये विविध ठिकाणी आवश्यक असणाऱ्या खेळण्यासाठी रबर फ्लोरिंग बसविणे विषय स्थगित करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे मधील सेक्टर-२२, भुखंड क्र.७५ ते ६९ ए समोरील ओपन नाल्याचा विकास करणेविषयक विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेतील अग्निशमन इमारतीकरीता तसेच ०५ प्रभाग कार्यालये येथे प्रायमरी आणि सेकंडरी इंटरनेट लीज लाईन घेण्याबाबतचा' विषय मंजूर करण्यात आला.

'पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती-अ, ढोंगऱ्याचापाडा, देविचापाडा गावामध्ये पूर्व निर्मित पावसाळी गटर बांधणे व रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे' विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ, ब , क , ड मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरीता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावार पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाच्या सकारात्मक व नकारात्मक भिन्नतेनुसार वाढीव रक्कमेस मान्यता मिळणेबाबतचा विषय सभेत मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती "अ", "क", व "ड" हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळयापूर्वी नाले सफसफाई करणेबाबतच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

# करंजाडेमध्ये रहिवासी इमारतीला आग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील करंजाडे सेक्टर आर वन येथे आज दुपारी एका रहिवासी इमारतीला भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. दुपारी सुमारे पाऊणे १२ वाजण्याच्या दरम्यान आग लागल्याची माहिती समोर आली असून ग्राऊंड फ्लोअरवरील दुकानाला प्रथम आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.



आग लागल्याचे समजताच इमारतीतील नागरिकांनी जीव वाचवण्यासाठी तातडीने बाहेर धाव घेतली. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी टँकरच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीचा आवाका मोठा असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून या घटनेत मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, करंजाडे परिसरात स्वतंत्र अग्निशमन केंद्र किंवा अग्निशमन बंब उपलब्ध नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहोचण्यास वेळ लागत असल्याने नुकसान वाढत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. करंजाडे परिसरासाठी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी नागरिकांकडून प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

## निवडक

### सेवानिवृत्त सैनिकाला मारहाण व लूट

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकात सेवानिवृत्त सैनिकाला मारहाण करून लुटल्याची घटना घडली आहे. त्यांना फलाटावर घेऊन जाण्यासाठी मदतीचा बहाणा करत दोघांनी हे कृत्य केले. या प्रकरणी पनवेल रेल्वे स्थानकात गुन्हा दाखल केला आहे. गंगाराम कदम (८४) असे निवृत्त सैनिकाचे नाव असून, ते ठाण्यात राहणारे आहेत. रात्री ते कणकवली येथील गावी जाण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात आले होते. भुयारी मार्गातून फलाटाकडे जात असताना भुयारात दोघांनी मदतीचा हात देत त्यांची बॅगही स्वत:कडे घेतली. यानंतर, काही अंतरावर गेल्यावर त्यांनी कदम यांना मारहाण करून त्यांचा मोबाइल, रोकड, घड्याळ असा ऐवज लुटून पळ काढला. एका प्रवाशाच्या मदतीने कदम यांनी घडलेल्या घटनेची माहिती कुटुंबीयांना रेल्वे पोलिसांकडे तक्रार केली.

### मारहाणप्रकरणी एकावर गुन्हा

**पनवेल :** दारू पिण्यावरून झालेल्या वादात बियरच्या बाटलीने भारहाण करून जखमी केल्याप्रकरणी सुशील सुनील मस्के (रा. झोपडपट्टी कोपरा गाव, खारघर) याच्याविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारदार व सुशील मस्के हे झोपडपट्टी सुवर्ण गंगा सिग्नल, कोपरगाव, खारघर येथे दारू पीत होते. यावेळी झालेल्या वादात सुशील याने तक्रारदाराला बीयरच्या बाटलीने मारहाण केली.

# महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन पळवणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

एका ओळखीच्या महिलेच्या घरात घुसून तिच्या गळ्यातील सोन्याची चैन कटरच्या साहाय्याने कट करून सदर महिलेला खाली पडून तो चैनसह पळून गेला होता. सदर आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून त्याच्या कडून चोरीची ७० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन हस्तगत केली आहे.

फिर्यादी ह्या करंजाडे येथे राहण्यास असून त्यांच्या ओळखीचा चेतन अरुण पिंगळे (वय २३ वर्षे) हा त्यांच्या घरात घुसून त्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन कट केली. त्यावेळी फिर्यादीने आडविण्याचा प्रयत्न केले असताना अटक आरोपीने त्यांना धक्का मारुन खाली पाडून गुडघ्याला दुखापत करुन फिर्यादीची चैन हिसकवुन खेचुन घेवुन फिर्यादीस धमकी दिली की " कोणाला सांगितले तर लक्षात ठेव मारुन टाकील " आणि पळुन जाताना फिर्यादीचे राहते घरास बाहेरुन कडी लावुन निघुन गेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला. पोउपनि हजरतअली पठाण, पोउपनि विनोद लभडे, आदींच्या पथकाने शोध घेऊन आरोपीला गजाआड केले.



**पनवेल : येथील महानगरपालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी अतुलनीय शौर्य, धैर्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेले स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर, ॲड. मनोज भुजबळ, रवींद्र भगत, अजय बहिरा, रवींद्र जोशी, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, महापालिका सदस्य, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

# फुंडे महाविद्यालयात मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेश परिक्षेसाठी मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी , वार्ताहर**

उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे व शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे सुपर थर्टी या उपक्रमा अंतर्गत बारावी सायन्स उत्तीर्ण मेडिकल आणि इंजीनियरिंग करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षभर मोफत नीट व जेईई परीक्षेसाठी वर्षभर मोफत मार्गदर्शन मिळणार आहे.

शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे हा उपक्रम फ्रेशभरात दहा ठिकाणी चालू आहे. या उपक्रमा अंतर्गत उरण तालुक्यातील विज्ञान शाखेच्या सर्व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य/शिक्षक यांची एक बैठक घेऊन उपक्रमाची माहिती दिली. त्यानंतर दिनांक २१ एप्रिल रोजी बारावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रकल्पाची माहिती दिली.

बारावी उत्तीर्ण झालेल्या मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेशाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे स्वप्नपूर्ती करण्यासाठी शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे सुपर थर्टी या उपक्रमांतर्गत वर्षभर निवासी मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. गरीब व गरजू इच्छुक विद्यार्थ्यांतील गुणवंत तीस विद्यार्थी नीट साठी व तीस विद्यार्थी जेईई परीक्षेच्या तयारीसाठी परीक्षा घेऊन निवडले जातील. परीक्षा बारावीच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल. परीक्षेचे गुण व विद्यार्थ्यांची वैयक्तिक मुलाखत घेऊन निवड प्रक्रिया केली जाईल.

# पनवेल तालुका पोलीस ठाण्यात शांतता कमिटी, पोलीस पाटील बैठक



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील शांतता कमिटी सदस्य व पोलीस पाटील यांची मासिक बैठक वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये आगामी सण-उत्सव अनुषंगाने सुरक्षेच्या दृष्टीने योग्य त्या सुचना मार्गदर्शन, बालविवाह रोखण्यासाठी पोलीस ठाण्यात माहिती देण्याबाबत सूचना केल्या आहेत. तसेच जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याबाबत माहिती, नशा मुक्ती, सायबर क्राईम, मार्गदर्शन केले आहे, गावातील अडीअडचणीवर चर्चा करून गावातील ज्येष्ठ नागरिक ,महिला , मुले यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने माहिती दिली आहे. गावातील व परिसरातील संशयित वस्तू ,वाहने , इसम तसेच अवैद्य धंद्यांची माहिती देणे, भाडेकरूंची माहिती देणे व CCTV बसविणे बाबत सोसायटी पदाधिकारी यांना माहिती देणे, हेल्पलाइन नंबर - डायल ११२, सायबर क्राईम हेल्पलाइन नंबर - १९३०, १९४५ . कोस्टल गार्ड हेल्पलाइन नंबर- १०९३, पोलीस बतावणे बाबत जनजागृती करणे, एखादे व्यक्ती/ कुटुंब यांना सामाजिक बहिष्कार करणे, वाढीत टाकने असा प्रकार हद्दीत होणार नाही याची दक्षता घेणे. व होत असल्यास तात्काळ पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा,

ग्रामीण भागातील नवतरुण मुलं मुले पोलीस खात्यात भरती होण्याकरता मार्गदर्शन करण्यात आले.

# चिरनेर येथे धर्मवीर संभाजी महाराजांची जयंती थाटात साजरी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या चिरनेर गावात १४ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची ३६९ वी. जयंती येथील छावा प्रतिष्ठानच्या वतीने साजरी करण्यात आली. ऐतिहासिक शिव थाटात साजऱ्या करण्यात आलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीला शिवकालीन स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे चिरनेर गावात जणू शिवसृष्टी अवतरली होती.छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन केणी यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांच्या प्रयत्नातून साजऱ्या करण्यात आलेल्या धर्मवीर शंभूराजांच्या जयंतीच्या सोहळ्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले होते. आरंभी छत्रपती शंभुराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले.



त्यानंतर श्री सत्यनारायणाची महापूजा आणि सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांना शाल आणि भगव्या टोप्या देऊन, त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. दरम्यान धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची महाआरती आणि आणि त्यांच्या स्मृतींना ऐतिहासिक मानाचा मुजरा करून, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. शिवकालीन वेशभूषा परिधान करून काल सायंकाळी ६:०० वाजता चिरनेर, कातळपाडा येथून निघालेल्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या तरुण-तरुणी,शालेय विद्यार्थी आणि महिला पुरुषांमध्ये यावेळी उत्साह संचारला होता. छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि छत्रपती संभाजी महाराज की जय या जयघोषांनी चिरनेर गावातील वातावरण दुमदुमून गेले होते.

या मिरवणुकीत प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाबाई, महाराणी येसूबाई या महान स्त्री-पुरुषांच्या साकारलेल्या व्यक्तिरेखा दिसून येत होत्या. मिरवणुकीत अश्व नृत्याचा थरारही पाहायला मिळाला. त्याचबरोबर महिला लेझीम पथकाची प्रात्यक्षिके यावेळी पाहायला मिळाली. सोबत हरीपाठातून संतांच्या नावाचा गजर होत होता.

# पंतप्रधानांच्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांकडून कर्मचाऱ्यांना ऊर्जा बचत उपाययोजना करण्याच्या सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर देशातील नागरिकांना केलेल्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी ऊर्जा, पाणी आणि इंधन बचतीसाठी महापालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी उर्जा बचत उपाययोजनांची नियमावली कटाक्षाने पाळण्याच्या सूचना दिल्या. या अनुषंगाने आयुक्तांनी आज महापालिका मुख्यालयातील सर्व विभागांना प्रत्यक्ष भेटी देऊन पहाणी केली व संबधित विभागातील कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे उपस्थित होते. यानंतर सर्व अधिकारी व विभाग प्रमुखांची ऑनलाईन बैठक आयुक्तांनी घेतली.



पंतप्रधानांनी देशातील नागरिकांना ऊर्जा बचत, स्वदेशी उत्पादनांचा वापर, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करण्याचे आवाहन केले आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने विविध विभागांसाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने याबाबत प्रस्तावित उपाययोजनांचे परिपत्रक काढले असून शासकीय कार्यालयांना सूचना दिल्या आहेत. ऑनलाईन बैठकीद्वारे महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना

आयुक्तांनी या विषयावर महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व विभाग प्रमुखांची ऑनलाईन बैठक घेऊन शासनाच्या परिपत्रकातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे याबबात सूचना दिल्या. महापालिकेच्या दैनंदिन कामकाजात ऊर्जा आणि पाण्याचा अपव्यय टाळून पर्यावरणपूरक उपायांचा अवलंब करण्यावर भर देण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

या सूचनांनुसार, कार्यालयांमध्ये विजेचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करावा. हरित ऊर्जा उपकरणांना प्राधान्य द्यावे तसेच विद्युत विभागाने सौरऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महापालिका कार्यालयांमधील वातानुकूलन यंत्रणेचा संयमाने वापर करण्याबाबत आयुक्तांनी यावेळी सूचना दिल्या. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर तसेच दालनाबाहेर पडताना दालनातील दिवे, पंखे आणि एसी बंद करूनच बाहेर पडावे असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

वाहन वापराबाबतही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर वाढवावा, शक्यतो कार-पूल करावा (अधिका-यांनी एकत्रपणे शेअरींग प्रवास करावा), कायालयीन कामकाजानिमित्त स्थळभेटीदरम्यान कमीत कमी वाहनांचा वापर करावा, असे सांगण्यात आले आहे.

> *देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानंतर ऊर्जा, पाणी आणि इंधन यांसारखी नैसर्गिक संसाधनांचा जपून आणि कार्यक्षम वापर करणे ही प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. यामध्ये महापालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची देखील सामूहिक जबाबदारी आहे. शासनाकडून प्राप्त सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून पनवेल महानगरपालिकेकडून पर्यावरणपूरक आणि जबाबदार प्रशासनाचा आदर्श निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे"*
>
> **-मंगेश चितळे,**
> *आयुक्त, पनवेल महापालिका*

# उष्माघाताचा धोका वाढल्याने काळजी घेण्याचे उरण आरोग्य विभागाचे आवाहन

**उरण : बातमीदार**

उरणसह संपूर्ण महाराष्ट्रात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून वाढत्या तापमानामुळे उरणच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सकाळपासूनच अंगाची लाही लाही करणारे ऊन, दुपारच्या वेळी भाजून काढणारी उष्णता आणि वाढती दमछाक यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. उष्णतेच्या या तीव्र लाटेमुळे राज्यात उष्माघाताच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली असून उरण तालुका आरोग्य विभागाने सर्व नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

यंदाच्या उन्हाळ्यात अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४० ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला आहे. उरण परिसरातही दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून अत्यावश्यक कामाशिवाय नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. अंगावर जाळ ओतणाऱ्या उन्हामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि कामगार वर्ग सर्वाधिक त्रस्त झाला आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमान आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली असून नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय उरणचे अधीक्षक डॉ बाबासाहेब कालेलं यांनी सांगितले की उष्माघाताची सुरुवातीची लक्षणे सामान्य वाटली तरी वेळेत उपचार न मिळाल्यास ती जीवघेणी ठरू शकतात.

## संपादकीय

# ऊर्जासंकटातील नव्या संधी!

भारतासाठी ऊर्जा सुरक्षा हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर सद्यस्थितीतील स्वावलंबनाचाही तो महत्त्वाचा मुद्दा आहे. कोळशापासून इंधनवायू तयार करण्याच्या योजनेचे आव्हान स्वीकारून भारताने संकटातून संधीच्या वाटा शोधल्या आहेत.

**इराण-अमेरिका युद्धामुळे निर्माण झालेल्या ऊर्जासंकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार केंद्र सरकारने नवे पर्याय निर्माण करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. भारताकडे कोळशाचा सुमारे 400 अब्ज टनांहून अधिक साठा आहे, आणि लिग्नाईटचा सुमारे 47 अब्ज टनांहून अधिक साठा आहे. जगातील सर्वात मोठा साठा असलेल्या या देशाच्या ऊर्जासंकंटात या पर्यायाचा नवा वापर करण्याची योजना केंद्र सरकारने आखली आहे. देशाच्या एकूण ऊर्जा गरजेपैकी जवळपास 55 टक्के गरज कोळशाच्या वापरातून भागविली जाते. आता या साठ्याचा वापर करून सिंथेसिस गॅस तयार करण्याच्या योजनेस पंतप्रधान मोदी यांच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. कोळसा आणि लिग्नाईटचे रूपांतर इंधनवायूमध्ये करण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर करून इंधन व रसायने तयार करण्याकरिता उपयुक्त ठरणारा कच्चा माल तयार करावा आणि त्याद्वारे खर्चिक आयातीला पर्याय शोधून इंधन आयातीच्या अस्थिरतेवर तोडगा काढावा असा या योजनेचा उद्देश असल्याने जागतिक पुरवठ्यातील अडथळे किंवा किमतींमधील चढ-उतारांपासून संरक्षण मिळेल यात शंका नाही. सरत्या आर्थिक वर्षात द्रवरूप नैसर्गिक वायू, युरिया, अमोनियम नायट्रेट, अमोनिया, जळणासाठी वापरला जाणारा कोळसा, मिथेनॉल आदींच्य आयातीवर सुमारे 2.75 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च झाली होती. सध्या पश्चिम आशियातील अस्थिरतेमुळे आयातीवर अवलंबून राहणे अनिश्चित झाले असताना केंद्र सरकारने मंजूर केलेल्या या नव्या प्रकल्पातून भक्कम पर्याय उभा राहीलच, शिवाय ऊर्जासंकटातून आत्मनिर्भरतेच्या संधीचे दरवाजे उघडले जातील, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. याआधी मंजूर झालेले आठ प्रकल्प प्रगतिपथावर असताना, अधिक आर्थिक पाठबळावर मंजूर झालेल्या नव्या योजनेमुळे ऊर्जा आयातीचे अवलंबित्व कमी होईल आणि ऊर्जा सुरक्षेचा संकल्प सिद्ध होईल. येत्या चार वर्षांत 100 दशलक्ष टन कोळशापासून वायूरूप ऊर्जाइंधन निर्मितीचे देशाचे लक्ष्य आहे. ते साध्य होईल, तेव्हा द्रवरूप नैसर्गिक वायू, युरिया, मिथेनॉल यांसारख्या पदार्थांच्या आयातीवर अवलंबून राहण्याची गरज कमी होईल, आणि आयातीला मजबूत पर्याय उपलब्ध होऊन 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया'च्या उद्दिष्टांना चालना मिळेलच, शिवाय कोळसा खाणींच्या क्षेत्रात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या नव्या संधीदेखील उपलब्ध होतील. ही योजना राबविताना संपूर्ण स्वदेशी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन दिले जाणार असल्याने, ऊर्जासंकटातील ही संधी देशाच्या कोळसा समृद्ध भागांमध्ये विकासाच्या नव्या वाटा निर्माण करेल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. अर्थात, हा हरित भविष्याचा अंतिम मार्ग नाही, तरीही, अक्षय ऊर्जेकडे जाणाऱ्या संक्रमणकाळातील संधींना जोडणारा एक नवा पूल म्हणून या योजनेची दखल घ्यावी लागेल. अक्षय ऊर्जा आणि हरित हायड्रोजनमध्ये देश किती वेगाने प्रगती करतो यावर या योजनेचे यश अवलंबून राहणार असल्याने, या योजनेतून भारताने एका मोठ्या आव्हानास हात घातला आहे. तरीही त्याचे महत्व असाधारण असेच आहे. कारण, पश्चिम आशियातील संघर्ष, जागतिक राजकारण, आणि ऊर्जास्रोतांच्या किंमतीमधील चढउतार हे लक्षात घेतले, तर केंद्र सरकार वास्तवाचे भान ठेवूनच वाटचाल करत आहे, याची खात्री देणारा पुरावा म्हणून या योजनेचे स्वागत करावयास हवे.**

# रायगड जिल्ह्यातील शेती क्षेत्र घटले





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणारा रायगड जिल्हा आता औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातोय. वाढते औद्योगिकरण, नागरीकरण, खारेपाणी जमीन नापिक होणे, नैसर्गिक आपत्ती यामुळे रायगड जिल्ह्यातील शेती क्षेत्रात मोठी घट झाली आहे. मागील वर्षात शेती लागवडीखालील क्षेत्र ५४ हजार हेक्टरने घटले आहे. औद्योगिकरण झाल्यामुळे नागरीकरणदेखील वेगाने होऊ लागले आहे.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकरणाचे वारे वाहत आहेत. जिल्ह्यात पाताळगंगा, रोहा, महाड, विळे भागाड, उसर यासारख्या औद्योगिक वसाहती आहेत. खालापूर, वडखळ, अलिबाग येथे एमआयडीसीचे नवे प्रकल्प प्रस्तावित आहेत, तर दिघी पोर्ट, दिल्ली मुंबई कॉरिडोर, बल्क ड्रग फार्मा पार्क सारखे प्रकल्प जिल्ह्यात येऊ घातले आहेत. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पही जिल्ह्यात विकसित केले जात आहेत. या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी ४५० हेक्टर, मुंबई-ट्रान्स हार्बर लिंकसाठी २८ हेक्टर, दिल्ली-मुंबई कॉरीडोरसाठी चार हजार हेक्टर, डेडीकेटेड फ्रिट कॉरिडोरसाठी १० हेक्टर, बाळगंगा धरण प्रकल्पासाठी एक हजार २१३ हेक्टर, खालापुर औद्योगीक क्षेत्र टप्पा २साठी नऊ हेक्टर, तर टप्पा तीनसाठी दोन हेक्टर, नवी मुंबई विमानतळासाठी ६८४ हेक्टर, रेल्वे मार्ग दुपदरीकरणासाठी ३१ हेक्टर, वडोदरा-मुंबई दृतगती मार्गासाठी ३१८ हेक्टर, पुणे-दिघी रस्त्यासाठी चार हेक्टर भूसंपादन झाले आहे. याशिवाय खाजगी औद्योगिक प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात भुसंपादन सुरू आहे. त्यामुळे शेती क्षेत्र मागील पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर घटले आहे.

पूर्वी एक लाख २४ हजार हेक्टरवर खरीपाची लागवड होत होती, मात्र आता हे भात लागवडीखालील क्षेत्र ९० हजार हेक्टरपर्यंत कमी झाले आहे. दरवर्षी यात घट होत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षी ७० हजार हेक्टरवरच भात पिकाची लागवड करण्यात आली होती. म्हणजे गेल्या दशकभरात जिल्ह्याच्या भात लागवडीखालील क्षेत्र जवळपास ५४ हजार हेक्टरची घट झाल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीवरून दिसून येते.


पूर्वी बांधबंदिस्ती होत असे. त्यामुळे उधानाचे पणी अडले जात असे, परंतु गेली कित्येक वर्ष जिल्ह्यात बांधबंदिस्ती झालेली नही. ही बांधबंदिस्ती होत नसल्यामुळे अनेक ठिकाणी बांध फुटून समुद्राचे खारे पाणी थेट समुद्रात घसून शेतजमीन नापिक बनली आहे. त्यामुळेदेखील शेतीक्षेत्र घटत चालेले आहे.

बहुतांश शेती ही खरीपाच्या लागवडीवर अवलंबून आहे. सिंचन नसल्यामुळे शोती करणे परवडत नाही. त्यामुळे शेती पड राहून ती नापिक बनते. औद्योगिकरण झाल्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्धद झाल्या आहेत. त्यामुळे तरूण वर्ग शेतीकडे वळत नाही. शेतावर काम करण्यासाठी मजूर मिळत नाहीत. परिणामी अनेक शेतकऱ्यांनी शेती करणे बंद केले आहे.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली पाहिजे. सगुणा भात लागवड तंत्रज्ञान, ड्रमसिडर याव्दारे तसेच यंत्राव्दारे लागवड केली पाहिजे. त्यामुळे मुनुष्यबळ कमी लागेल त्याचबरोबर उत्पादकतादेखील वाढेल. चारसुत्री लागवढ पद्धतीने भाताची लागवड केल्यात उत्पादकता वाढते. त्याचबरोबर सुधारित जातींची बियाणे वापरली पाहिजेत. शासन शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहे. विविध योजना राबवत आहे. त्याला काही प्रमाणत यश येत आहे.

दरवर्षी शेतीच्या लागवड क्षेत्रात घट होत आहे असे असले तरी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन उत्पादकता वाढवता येते. केवळ शेती क्षेत्र घटतंय म्हणून गप्प बसून चालणार नाही. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेती क्षेत्र वाचवले पाहिजे. त्याचबरोबर उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. भातशेतीवरच अवलंबून न राहता आता भाजीपाला, कडधान्य उत्पादन, नगदी पिक याकडे वळले पाहिजे. जे विकते ते पिकवले पाहिजे.





## बदलते तंत्रज्ञान

# 'मोटोरोला'चा रेझर फोल्ड स्मार्टफोन भारतात लॉन्च

मोबाईल तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी मोटोरोलाने भारतीय बाजारपेठेत आपला पहिला प्रिमियम फोल्डेबल स्मार्टफोनमोटोरोला रेझर फोल्ड लॉन्च झाला. हा फोन केवळ त्याच्या डिझाइनसाठीच नाही, तर फोल्डेबल स्मार्टफोनच्या जगातील सर्वात शक्तिशाली बॅटरी आणि कॅमेरा सिस्टमसाठी चर्चेत आला आहे. या फोनच्या टॉप व्हेरिएंटची किंमत एक लाख ७० हजार रुपये आहे, मात्र हा फोन ५,५५६ रुपयांच्या ईएमआयवर उपलब्ध आहे.



या स्मार्टफोनच्या खरेदीवर ग्राहकांना १० हजार रुपयांचे इस्टंट बँक डिस्काउट मिळत आहे, तर एक्स्चेंज ऑफरमध्ये ग्राहकांना १० हजार रुपयांपर्यंत सूट मिळवण्याची संधी आहे. शिवाय, हा फोन फोन ५,५५६ रुपयांच्या ईएमआयवर उपलब्ध असून निवडक बँकांवर १८ महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट इएमआयवरदेखील उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी ग्राहकांनी कंपनीच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

मोटोरोला रेझर फोल्डच्या कॅमेरा सिस्टमला 'DXOMARK Gold Label' मिळाले आहे. यामध्ये ट्रिपल ५०MP प्रो-ग्रेड कॅमेरा सेटअप आहे. यात Sony LYTIA ८२८ मुख्य सेन्सर आणि १००x सुपर झूमसह ५०MP पेरिस्कोप कॅमेरा देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा फोन ८K डॉल्बी व्हिजन रेकॉर्डिंगला सपोर्ट करतो.

फोल्डेबल फोन्समध्ये आतापर्यंतची सर्वात मोठी ६,०००mAhची सिलिकॉन-कार्बन बॅटरी यात देण्यात आली. एका चार्जवर ही बॅटरी ४३ तासांहून अधिक काळ टिकते, असा दावा कंपनीने केला आहे. यासोबतच ८०W टर्बोपॉवर फास्ट चार्जिंग आणि ५०W वायरलेस चार्जिंगची सुविधाही उपलब्ध आहे.

या फोनमध्ये ८.१ इंची २K एक्सट्रीम AMOLED मुख्य डिस्प्ले आणि ६.६ इंची बाह्य डिस्प्ले देण्यात आला आहे. मुख्य स्क्रीनची ब्राइटनेस ६,२०० निट्सपर्यंत असून ती अतिशय स्पष्ट व्हिज्युअल्स प्रदान करते. याव्यतिरिक्त, कंपनीने मोटो बड्स २ प्लसदेखील लॉन्च केले आहेत, ज्याची किंमत ४ हजार ९९९ रुपये आहे. मोटोरोलाचा हा नवा फोल्डेबल फोन सॅमसंग आणि वनप्लससारख्या कंपन्यांच्या प्रिमियम फोनला मोठी टक्कर देण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्रातील महिला संत जनाबाई



## निमित्त

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड गावात इ.स.१२६५मध्ये संत जनाबाईंचा जन्म झाला होता. त्यांच्या आईचे नाव दमाबाई आणि वडिलांचे नाव करुंड होते. त्यांचे वडील पेशाने वैद्य असल्याचे कळते. त्यांच्या आई-वडिलांचे लवकरच निधन झाल्याने जनाबाई सहा वर्षाच्या असताना गावातील लोकांनी त्यांना पंढरपूरच्या वाळवंटात आणून सोडले असे सांगितले जाते. हे बाळ तेथे रडत असताना दामाशेटी यांनी त्यांना पाहिले व ते तिला स्वतःच्या घरी घेऊन गेले. जनाबाईंचा शेवटपर्यंत चांगल्या पद्धतीने दामाशेटी यांनी सांभाळ केला. ते संत नामदेव महाराजांचे वडील होते.


शेकडो वर्ष महाराष्ट्राच्या मुखात दोन संतांचे अभंग ऐकावयास मिळतात ते दोन संत म्हणजे संत तुकाराम महाराज आणि संत जनाबाई. सावळी विठाई म्हणजे दीनदुबळ्यांची आई. सुखदुःख जाणून घेणारी माऊली.असे अनेक अभंगातून विठ्ठलाचे आणि रखुमाईचे गोड वर्णन या अनाथ संत जनाबाईने केलेले आहे.

विठ्ठलाच्या मंदिरासमोरच झोपडीत राहणाऱ्या जनाबाईवर ज्यावेळेस विठ्ठलाचे सोने-नाणे चोरल्याचा आरोप होतो. त्यावेळेस ती म्हणते मी सोन्यानाण्याची नव्हे तर विठ्ठलाची चोरी केली आहे. आणि त्याला माझ्या ह्रदयात बंदिस्त करून ठेवले आहे. अशी ती धरीला पंढरीचा चोर या अभंगातून सांगते. माझे अचडे बचडे छगुले ग राधे रुपडे अशा अभंगामधून विठ्ठलाच्या बाळ रूपाचे वात्संल्याचे अभंग तर तिचे अप्रतिम ठरलेले आहेतच. विठू माझा लेकुरवाळा| संगे गोपाळांचा मेळा| हा अभंग संत जनाबाईंनी लिहिलेला आहे.

ज्ञानेश्वरांविषयी त्या म्हणतात परलोकीचे तारूश्र म्हणे माझा ज्ञानेश्वरु संत जनाबाईंचे अभंग दूरपर्यंत लोकप्रिय झाले आणि तिची ख्याती कबीरांच्या कानी गेली. इतके सुंदर अभंग रचणारी ही स्त्रीआहे तरी कोण या उत्सुकतेपोटी संत कबीर जनाबाईच्या भेटीसाठी पंढरपुरास आले. पंढरपुरास आल्यानंतर त्यांना कळाले की ती संत नामदेवांच्या घरी कामाला आहे. संत नामदेवांच्या घरी गेल्यानंतर त्यांना कळाले की जनाबाई गोपाळपुरास गवऱ्या थापायला गेली आहे. तिला परत घरी येण्यासाठी काही वेळ लागेल.दुसऱ्याच्या घरी असे काम करणारी बाई असे अभंग लिहिते याचे त्यांना विशेष वाटले.आजही जनाबाईंच्या ओव्या लोकांना अतिशय प्रिय आहेत. खेड्यापाड्यांमध्ये जणाबाईंच्या ओव्या आजही आनंदाने गायल्या जातात. विशेष करून कोकणामध्ये जनाबाईंच्या ओव्या फारच प्रसिद्ध आहेत. जनाबाईंची काकड आरतीही फार प्रसिद्ध आहे. तसेच संत जनाबाईंचे अनेक अभंग नामदेव गाथेमध्ये आढळतात. कृष्णजन्म, प्रल्हाद चरित्र, बाल क्रीडा या विषयावर तिचे अभंग आहेत.

संत नामदेव हेच त्यांचे परमार्थिक गुरु समजले जातात. संत ज्ञानदेव -विसोबा खेचर- संत नामदेव- संत जनाबाई , अशी ही गुरु शिष्यांची परंपरा चालत आलेली आहे.संत ज्ञानदेव महाराजांच्या काळातील सर्व संतांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. संत जनाबाई आषाढ कृष्ण त्रयोदशीला शके १२७२ इ.स.१३५०मध्ये समाधीस्थ होऊन पांडुरंगामध्ये विलीन झाल्या. शेवटी जनाबाई नामदेव पायरीच्या चिरासोबतच अंतराधीन पावल्या. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# मेहनत न करताही थकवा, चक्कर येतेय? हे करा..

एखादा मेहनतीचं किंवा जड उचल-खाचल करण्याचं काम केलं की, थकवा-सुस्ती येते हे आपल्याला माहीत आहेच, पण अनेकदा अनेकांसोबत असंही होतं की, कोणतंही मेहनतीचं काम न करतादेखील थकवा येतो, चक्कर येते किंवा सुस्ती येते. इतकंच नाही तर कोणत्या कामात मनही लागत नाहीत. खासकरून उन्हाळ्यात असं अनेकदा होतं. पण असं का होतं, हे अनेकांना माहीत नसतं. तेच आपण समजून घेणार आहोत. जेणेकरून वेळीच यावर उपाय करता येईल.



उन्हाळ्यात अशक्तपणा येण्याचं सर्वात मोठं कारण म्हणजे डिहायड्रेशन. शरीराचं तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी घाम येतो, मात्र घामासोबत फक्त पाणीच बाहेर जात नाही, तर सोडियम आणि पोटॅशिअमसारखी महत्त्वाची खनिजेही शरीरातून कमी होतात. ही मिनरल्स स्नायू आणि नसांच्या कार्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. त्यांची कमतरता झाल्याने ब्लड सर्कुलेशन स्लो होतं आणि थकवा, अशक्तपणा तसेच चक्कर येण्याची समस्या निर्माण होऊ शकते.

**उन्हाळ्यातील अशक्तपणापासून बचाव कसा कराल?**

**हायड्रेशनकडे विशेष लक्ष द्या**

दिवसभरात किमान ८ ते १० ग्लास पाणी प्या. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, लिंबूपाणी, ताक आणि ओआरएसचे द्रावण घेणे फायदेशीर ठरते. यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता भरून निघते.

**हलका आणि पौष्टिक आहार**

एकावेळी जड जेवण करण्याऐवजी थोड्या-थोड्या अंतराने हलका आहार घ्या. कलिंगड, खरबूज, संत्री यांसारखी फळे आणि काकडी, दोडका यांसारख्या पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या भाज्या खा.

**उन्हापासून बचाव करा**

दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत सूर्याची किरणे सर्वाधिक तीव्र असतात. त्यामुळे शक्यतो बाहेर जाणे टाळा. बाहेर जाणे आवश्यक असल्यास सूती कपडे वापरा आणि डोके झाकून ठेवा.

**पुरेशी झोप घ्या**

उन्हाळ्यात उकाड्यामुळे झोप व्यवस्थित होत नाही. त्यामुळे शरीराला पुरेशी विश्रांती मिळत नाही. दररोज किमान सात ते आठ तास झोप घेण्याचा प्रयत्न करा. जास्त त्रास वाटल्यास डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या.

# रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रयत्नशील -पर्यटनमंत्री शंभूराज देसाई

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी जिल्ह्यात सुरू असलेल्या पर्यटनांच्या कामांना गती देण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन विभागाने कार्यवाही करावी अशा सूचना पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केल्या.मेघदूत शासकीय निवासस्थान येथे रायगड लोकसभा मतदारसंघातील पर्यटन विभागाच्या कामासंदर्भात आयोजित बैठकीत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते.



यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार सुनिल तटकरे, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, उपसचिव संतोष रोकडे, उपसचिव विजय पोवार, पर्यटन संचालनालयचे उपसंचालक रविंद्र पवार यासह रायगड जिल्ह्याचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीव्दारे बैठकीला उपस्थित होते.

मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, रायगड जिल्हा पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्वाचा जिल्हा असून जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटनाची कामे गतीने करण्यात यावीत. प्रादेशिक पर्यटन मधील जी प्रलंबित कामे आहेत त्याची सद्यस्थिती काय आहे हे लक्षात घेवून पर्यटन विभागाने वित्त विभागाकडे जिथे निधीची आवश्यकता आहे त्याची मागणी करावी. पर्यटन विभागाची कामे करण्यासाठी उपलब्ध निधीतून कामांची प्राथमिकता लक्षात घेवून निधी देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. व स्टार गेझिंगचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेला पाठविण्यात येईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे निवासी न्याहारीचे नोंदणीचे कॅम्प आयोजित करण्यासाठी कार्यवाही करावी. स्वदेश दर्शन योजना प्रस्ताव लवकरात लवकर केंद्र शासनाकडे पाठवावा असे निर्देश त्यांनी दिले.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, कासव संवर्धन, पेशवे स्मारक ही कामे पूर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे, पर्यटनच्या ज्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे त्या कामांना निधी पर्यटन विभागाकडून देण्यात यावीत. केंद्र शासनाकडे स्वदेश दर्शन योजनेसाठी पर्यटन विभागाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पर्यटनाच्या कामांना निधीची मागणी करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे निवासी न्याहारीचे नोंदणीचे कॅम्प आयोजित करावेत, असे सांगण्यात आले.

## रोहा येथे आज तालुकास्तरीय कृषी मेळावा

### प्रात्यक्षिक, प्रदर्शनासह प्रगतशील शेतकऱ्यांचा होणार सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका कृषी क्षेत्रात अधिक समृद्धी, आधुनिकता आणि प्रयोगशीलता यावी यासाठी रोहा कृषी प्रशासन कटिबद्ध झाले आहे. याच अनुषंगाने पंचायत समिती रोहा व तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता पंचायत समिती रोहा येथे हा मेळावा पार पडणार असल्याची माहिती कृषी अधिकारी रणजीत लवटे यांनी दिली.

दरम्यान, आयोजित कृषी मेळाव्यात कृषीविषयक विविध प्रात्यक्षिके, आधुनिक शेती तंत्रज्ञान प्रदर्शन, कृषी साहित्यांचे वाटप तसेच प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तालुक्यात कृषी चळवळीत योगदान देत नाविन्यपूर्ण व प्रयोगशील उपक्रम राबविणाऱ्या अनेक शेतकऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंत्री आदिती तटकरे उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून खासदार सुनील तटकरे उपस्थित राहणार आहेत. याशिवाय आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी खासदार धैर्यशील पाटील, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, सभापती विजया पाशिलकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कृषी क्षेत्रातील नव्या संकल्पना, आधुनिक शेती पद्धती, उत्पादनवाढ आणि शाश्वत शेतीसंदर्भातील माहिती या मेळाव्यातून शेतकऱ्यांना मिळणार आहे. प्रात्यक्षिके व प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मार्गदर्शन मिळणार असून कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी या कृषी मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कृषी अधिकारी रणजीत लवटे, तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी केले आहे.

## ‘बाटू’चा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**माणगाव : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत ॲडव्हान्स डिप्लोमा इन वॉटर क्वालिटी मॅनेजमेंट( ADWQM) प्रगत पदवीका अभ्यासक्रम आणि डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने दिनांक १६ मे २०२६, शनिवार रोजी भव्य “माजी विद्यार्थी स्नेहमेळावा २०२६” आयोजित करण्यात आला आहे. हा बहुप्रतीक्षित कार्यक्रम डिप्लोमा ऑडिटोरियम येथे सकाळी ९.३० वाजल्यापासून सुरू होणार असून विद्यापीठातील विविध वर्षांतील माजी विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होणार आहेत.

“Reconnect Relive Rejoice” या आकर्षक संकल्पनेवर आधारित हा स्नेहमेळावा माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्यांच्या जुन्या मित्र-मैत्रिणींशी, प्राध्यापकांशी आणि विद्यापीठाशी भावनिक नाते दृढ करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देणार आहे. शिक्षण पूर्ण करून वॉटर ट्रीटमेंट या औद्योगिक क्षेत्रांत आपली ओळख निर्माण करणारे तसेच ऊर्जा क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करणारे अनेक माजी विद्यार्थी आणि आताचे यशस्वी उद्योजक व अभियंते या कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या अनुभवांची, संघर्षांची आणि यशोगाथांची मांडणी करणार आहेत.

या स्नेहमेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे “Sharing of Experiences / Success Stories” हे विशेष सत्र ठरणार आहे. विविध उद्योग, तंत्रज्ञान, प्रशासन आणि उद्योजकता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे माजी विद्यार्थी आपल्या प्रवासाची कहाणी मांडणार असून त्यातून सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि करिअर विषयक दिशा मिळणार आहे.

दुपारनंतर आयोजित करण्यात आलेल्या “Reminiscence Memories” या विशेष सत्रात जुन्या आठवणींना उजाळा देणारे व्हिडिओ सादर करण्यात येणार आहेत. त्यानंतर Alumni Interaction Session मधून माजी विद्यार्थी आणि सध्याचे विद्यार्थी यांच्यात मुक्त संवाद साधला जाणार आहे.

कार्यक्रमाची सांगता संगीत मैफिल, मनोरंजन आणि स्नेहसंवादाने होणार आहे.हा कार्यक्रम केवळ एक मेळावा नसून जुन्या आठवणी, नव्या प्रेरणा आणि दृढ नात्यांचा उत्सव ठरणार आहे.जुन्या आठवणींना नव्याने उजाळा देत, प्रेरणा आणि मैत्रीचा सेतू पुन्हा एकदा मजबूत करणारा हा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा निश्चितच संस्मरणीय ठरणार आहे

## नागोठण्यात जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात शनिजयंती उत्सवाची तयारी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथे शनिवार दि. १६ मे रोजी वैशाख वद्य ३० अमावस्येनिमित्त शनिजयंती उत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिराच्या प्रांगणात होणाऱ्या या पावन उत्सवात सर्व भाविकांनी सहपरिवार उपस्थित राहून श्री शनिदेवांचे कृपाआशीर्वाद प्राप्त करावेत, असे आवाहन श्री शनि सेवा समिती, नागोठणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शनिवार दि. १६ मे रोजी संध्याकाळी ७:०० वाजता श्री शनिदेवांची स्थापना करण्यात येणार असून, सायंकाळी ७:३० वाजल्यापासून दर्शन सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून रात्री ९:३० वाजता महाआरतीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

या शनिजयंती उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील भाविकांमध्ये यानिमित्ताने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे, अशी माहिती आयोजक श्री शनि सेवा समिती, नागोठणे-रायगड यांच्या वतीने देण्यात आली आहे.

## जिंदल विद्यामंदिर साळावचे बारावीच्या परीक्षेत देदीप्यमान यश; १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव या विद्यालयाने सीबीएसई इयत्ता बारावी परीक्षेत यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत १०० टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील सर्व ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

वाणिज्य शाखेत स्वयंम वाकडे याने ८६.४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. इबाद मुकादम याने ८५.७ टक्के, तर कृष्णा दिवेकर हिने ७४ टक्के गुण मिळवत विशेष यश प्राप्त केले. विज्ञान शाखेत सोहम घरत याने ७९ टक्के गुण मिळवत अव्वल स्थान मिळवले. तसेच अन्वेशा भट्टाचार्य हिने ७८ टक्के आणि इस्माईल मुकादम याने ७६.८ टक्के गुण संपादन करून विद्यालयाच्या यशात भर घातली.

विद्यालयाचे प्राचार्य श्री. मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, “विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यातही असेच यश संपादन करून विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे.”उपप्राचार्य श्री. मंगेश बमनोटे म्हणाले, “विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे हे यश असून त्यांनी शिस्त, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी केली आहे.”शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. पंकज मलिक यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, “शैक्षणिक यशासोबतच विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून आदर्श नागरिक बनावे.”

जे. ई. टी. प्रमुख डॉ. श्री. भावेश भालेराव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत म्हटले की, “जिंदल विद्या मंदिर हे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र म्हणून ओळखले जाते.




## नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिव्यांग दाम्पत्याला दिला उपजीविकेचा आधार



**धाटाव : प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत रोहा नगरपालिकेच्या नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिव्यांग दाम्पत्याला उपजिविकेसाठी भक्कम आधार देत स्तुत्य उपक्रम राबविला आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या दिव्यांग पती-पत्नीला स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी त्यांनी पुढाकार घेत भाजी मार्केटमध्ये स्टॉल उपलब्ध करून दिला.

यावेळी मुख्याधिकारी अजय एडके, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांच्यासह नगरसेवक महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, अजित मोरे, माझ सवाल, आलिम मुमेरे, पी बी सरफळे, आरोग्य अधिकारी मनोज पुळेकर आदी उपस्थित होते.

रोहा शहरातील दिनेश वाघे आणि वर्षा वाघे हे दोघेही दिव्यांग असून शारीरिक असमर्थतेमुळे त्यांना रोजगारासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आर्थिक परिस्थितीही हलाखीची असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला होता. याची माहिती मिळताच नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी दाम्पत्याची प्रत्यक्ष भेट घेत त्यांच्या परिस्थितीची पाहणी केली.

केवळ आश्वासनांपुरते न थांबता नगराध्यक्षांनी कृतीतून मदतीचा हात पुढे केला. प्रशासन तसेच सर्व नगरसेवक व नगरसेविकांना विश्वासात घेऊन नगरपालिकेच्या भाजी मार्केटमध्ये या दाम्पत्यासाठी स्टॉल उपलब्ध करून देण्यात आला. तसेच व्यवसाय उभा करण्यासाठी आवश्यक आर्थिक मदत म्हणून वनश्री शेडगे यांनी वैयक्तिक दहा हजार रुपयांची मदतही दिली.

“दिव्यांग बांधव हे समाजाचा अविभाज्य घटक आहेत. त्यांना केवळ सहानुभूती नव्हे, तर स्वाभिमानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे. नगराध्यक्ष म्हणून माझी सामाजिक जबाबदारी ओळखून हा छोटासा प्रयत्न केला आहे. यापुढेही दिव्यांग बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीन,” असे नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी सांगितले.

## आमणोली गावाकडे जाणारा प्रवासी पूल कोसळला; सुदैवाने जीवितहानी नाही

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात एक धक्कादायक अपघाती घटना घडली. बुधवारी दि. १३ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास आमणोली गावाला जोडणारा पूल कोसळला. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या हायवा (डंपर) मुळे हा पूल कोसळण्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी पुढील गावांच्या प्रवासाचा मोठा प्रश्न याठिकाणी निर्माण झाला आहे.

जांभूळपाड्यापासून पुढे आमणोली, दहिगाव, कोलतरे तसेच आदिवासी वाड्यांकडे जाणारा हा मार्ग आहे. कमी वजन क्षमतेचा व छोटा असणारा पूल गावातील नागरिकांच्या प्रवासाकरिता एकमेव व महत्त्वाचा मार्ग आहे, मात्र आता पाऊस डोक्यावर असताना पूल कोसळल्याने नागरिकांना मोठ्या आवाहनांचा सामना करावा लागणार आहे. काहीच दिवसात विद्यार्थ्यांच्या शाळा, कॉलेज सुरु होतं आहेत आणि अशातच पूल तुटल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानदेखील होणार आहे.

विशेष म्हणजे सदरचा पूल हा प्रवाशांकारिता प्रवासासाठी वापरात असताना मात्र उद्योजक, व्यावसायिक या पुलावरून मोठ्या प्रमाणावर अवजड मालवाहतूक वाहनांची सततची अवैधरित्या वाहतूक करीत असतात. ग्रामस्थांच्या वारंवार तक्रारीवरूनसुद्धा अवजड वाहनांची मालवाहतूक ही सतत चालू होती. अखेर पूल कोसळण्याची दुर्घटना घडली असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## खोपोलीत छत्रपती संभाजी महाराज चौकाचे उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

मुख्य बाजारपेठेतील रेल्वे स्टेशन मार्गावरील दीपक चौक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चौकाचे छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले.

स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज यांचे तरुण पिढीला स्मरण होणे गरजेचे आहे. स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी याप्रमाणे कर्जतला छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारक उभारले त्याच पार्श्वभूमीवर आमदार थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोलीतही छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक व्हावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी उद्घाटन प्रसंगी काढले

या उद्घाटन समारंभाला उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, माज उपनगराध्यक्ष मोहन अवसरमल, महिलाव बालकल्याण सभापती सुवर्णा मोरे, नियोजन सभापती प्रतीक्षारेटरकर, शिक्षण सभापती अमित फाळे, बांधकाम सभापती अनिल सानप, आरोग्य सभापती मयुरी शेलार, नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**पशुवैद्यकीय विभाग**
**(शुध्दीपत्रक)**
**जाहीर सुचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये भटके श्वान (कुत्रे)/ मांजराचे निर्बिजीकरण करणेकामी मनुष्यबळ आधारित नव्याने प्रस्ताव तयार करणेकामी बाजारभाव दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी सदरचे बाजारभाव दरपत्रक दिनांक **२१/०५/२०२६** रोजी सायं **४.००** वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांक नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही. या जाहीर सुचना बाबत चा सविस्तर तपशील पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**जा.क्र. पमपा/पशुवैद्यकीय सेवा /३९५/२०२६-२७**
दिनांक : १४/०५/२०२६

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे, की मौजे मोसारे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन **१) श्रीमती सरला संतोष देशमुख, २) श्री. रविंद्र मोरेश्वर सुर्यराव, 3) श्री. अरविंद मोरेश्वर सुर्यराव, ४) श्रीमती भारती भालचंद्र सुर्यराव, ५) श्री. सागर भालचंद्र सुर्यराव, ६) श्रीमती सोनल मिलिंद साळुंखे, ७) श्री. केतन अरविंद चौधरी, ८) श्री. निकेश अरविंद चौधरी, ९) श्रीमती चिमाबाई रामचंद्र बागराव, १०) श्री. बाळू किसन अधिकारी, ११) श्रीमती सुनंदा रमाकांत चौधरी, १२) श्री. रविंद्र गुलाबराव देशमुख आणि १३) श्रीमती प्रतिभा प्रमोद देशमुख** यांचे सातबारा सदरील नावे असलेल्या त्यांच्या वहिवाटीतील व ताबे कब्जातील तसेच त्याच्या सामाईक मालकीची ही शेतजमिन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे मोसारे, तालुका-पनवेल, जिल्हा -रायगड

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पध्दती | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| **१०५/७** | भोगवटादार वर्ग-**१** | एकूण ०-**२२-००** इतक्या क्षेत्रापैकी लिहून देणार याचे हिश्श्यास येणारे क्षेत्र | **०.९४** |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याची हमी सदरहू मिळकतीच्या मालकांनी दिलेली आहे. तरीही वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहीवाट ताबा कब्जा, इजमेंट, गहाण, साठेकरार परोक्त दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज, दावा, वगैरे अशा संदर्भात कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने लेखी हरकती दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे

वरिल मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तकार न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा अगर हितसंबंध नाही, असे समजून आमने अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**तारिख १४/०५/२०२६**

**सही/-**
**ॲड. सुभाष किसन वास्कर**
**(वकील उच्च न्यायालय)**

कार्यालय :- ८८, पहिला मजला, बिल्डिंग नं. ३. पनवेल महानगरपालिका संकुल, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड नवी मुंबई ४१०२०६. मोबाईल: ८१६९४२६२९६

# सुधागडात अवकाळी पावसाचा तडाखा

## पाली-खोपोली महामार्गावर होर्डिंग कोसळले



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यात अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून पाली-खोपोली राज्य महामार्गावरील तिवरे, खुरावले फाट्याजवळ एक मोठे होर्डिंग कोसळले. सुदैवाने त्या ठिकाणी नागरिक उपस्थित नसल्याने जीवितहानी टळली, मात्र या घटनेमुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

स्थानिक नागरिकांनी या होर्डिंगबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या होत्या. रस्त्यालगत उभारलेले हे होर्डिंग पडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाले होते. याबाबत वारंवार निदर्शनास आणून दिले होते. तरीही संबंधित प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. परिणामी अवकाळी पावसाच्या जोरदार वाऱ्यामुळे हे होर्डिंग कोसळले.

याबाबत नागरिकांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला असून वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष का केले? असा जाब विचारला आहे. या घटनेमुळे भविष्यात अशा होर्डिंगमुळे मोठा अपघात होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

अवकाळी पावसामुळे अनेक भागांत झाडे उन्मळून पडली, वीजपुरवठा खंडित झाला आणि वाहतुकीत अडथळे निर्माण झाले. प्रशासनाने तातडीने कारवाई करून रस्त्यालगत असलेली धोकादायक होर्डिंग्स हटवावीत व सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# रायगडात ४३४५ विद्यार्थ्यांना आरटीई प्रवेशाची लॉटरी

## शिक्षण हक्काबाबत पालकांचा प्रतिसाद



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी झालेल्या ऑनलाईन सोडतीत (लॉटरी) ४ हजार ३४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना नामांकित खासगी शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली असून पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

रायगड जिल्ह्यातील २७० शाळांमध्ये ४७८४ जागा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यासाठी ९४८९ एकूण अर्ज प्राप्त झाले होते. राखीव जागांपैक्षा दुपट अर्ज आल्याने शालेय शिक्षण विभागामार्फत पारदर्शक पद्धतीने ही सोडत काढण्यात आली.

जिल्ह्यातील विविध खासगी विनाअनुदानित शाळांमधील रिक्त जागांसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून संगणकीकृत प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली असून पालकांना एसएमएसद्वारेही माहिती देण्यात आली आहे.

यातील ६२ विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया अंतीम करण्यात आली आहे. आरटीई अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासह शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामध्ये शिक्षण शुल्क, पाठ्यपुस्तके, गणवेश यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी ठरवून दिलेल्या कालावधीत आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा पुढील प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

**आरटीई प्रवेश प्रक्रियेला या वर्षी पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून शिक्षणाच्या हक्काबाबत जागरूकता वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रशासनाकडून प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती. एकूणच या लॉटरीमुळे हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला असून, त्यांच्या भविष्यासाठी ही संधी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**

**-ललिता दहीतुले, शिक्षणाधिकारी, रायगड**

# आमदार दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त करिअर मार्गदर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग-मुरुड-रोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या भविष्यास दिशा देणारा समाजोपयोगी उपक्रम मुरुड तालुक्यात उत्साहात पार पडला. रायगड जिल्हा परिषद कोर्लई गणाच्या सदस्य ज्योती नागावकर यांच्या पुढाकारातून महाळुंगे समाजमंदिर येथे 'दहावी आणि बारावीनंतर काय?' या विषयावर भव्य विद्यार्थी समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात मुंबई उत्पादन शुल्क विभागाचे माजी आयुक्त सुहास पाटील यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींबाबत



मार्गदर्शन करताना दहावी-बारावीनंतर उपलब्ध असलेले अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा, नोकरीच्या संधी, कौशल्याधारित शिक्षण तसेच बदलत्या काळातील करिअर क्षेत्रांची माहिती प्रभावीपणे उलगडून सांगितली. विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील अनेक प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार करिअरची दिशा निवडावी, पालकांनी मुलांना सकारात्मक पाठबळ द्यावे, असा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी दिला.

या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक पंचायत समिती मुरुड माजी सभापती रमेश नागावकर, जिल्हा परिषद सदस्य ज्योती नागावकर आणि शैलेश रातवडकर होते. कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी, पंचायत समिती उपसभापती अश्विनी जंगम, गणेश नाक्ती, अश्विनी ठाकूर, गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, सामाजिक कार्यकर्ते भगीरथ पाटील, भरत बेलोसे, सुचिता पालवणकर, मुकुंद पालवणकर, केंद्रप्रमुख तथा विस्तार अधिकारी महेश कवळे, सुनील पाटील, निलेश वारगे, तालुका शिक्षण समिती सदस्य देवानंद गोगर, शरद पाटील, दर्शना सातामकर यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी पालकांसह उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र नाईक आणि जगदीश चवरकर यांनी केले.

# जिते येथे माऊली आध्यात्मिक निवासी बाल संस्कार केंद्र शिबिर



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ-कशेळे राज्य मार्गावर जिते फाटा येथे माऊली आध्यात्मिक बाल संस्कार शिबिर ज्ञानपीठ केंद्र सुरू करण्यात आले आहे. कर्जत व आजुबाजूच्या तालुक्यातील ४० मुलांनी येथील शिबिरात सहभाग नोंदवला आहे.

पूर्णपणे निवासी स्वरूपातील बाल संस्कार केंद्र १३ वर्ष सुरू असून यापूर्वी तीन वर्षे जिते येथे, तीन वर्षे पोशीर येथे, दोन वर्षे खालापूर येथे आणि अन्य ठिकाणी तीन वर्षे बाल संस्कार केंद्र उभारून येथे सुरू आहे. आपल्याला लहान मुलांना शाळेमध्ये पुस्तकी ज्ञान दिले जाते, परंतु आपल्या मुलांना आध्यात्मिक संस्कार करणे हे खूप गरजेचे आहे. लहान मुलांना लहानवयातच आध्यात्मिक ज्ञान देणे गरजेचे आहे. हे अध्यात्मिक ज्ञान घेण्यासाठी आळंदी, पंढरपूर येथे आपल्या मुलांना पाठवावे लागत होते. याची जाणीव पिंपळोली येथील हभप विजयमहाराज पाटील यांना झाली. आध्यात्मिक बाल संस्कार घडवण्यासाठी त्यांच्या संकल्पनेतून माऊली अध्यात्मिक बाल संस्कार शिबिर ज्ञानपीठ केंद्र जिथे फाटे येथे सुरू करण्यात आले.

या बाल संस्कार केंद्रामध्ये मृदुंग वादन, हार्मोनिया, कीर्तन, भजन, हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, तसेच गीता पठण करून मुलांना शिकविले जात आहे. मृदुंग वादन शिकवण्यासाठी हभप गणेशमहाराज पाटील हे आपला स्वतःचा गॅरेजचे काम पंधरा दिवस बंद ठेवून शिबिराच्या माध्यमातून मुलांना मृदुंग शिकवत आहेत तसेच श्रीमद् भगवद्गीता, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ ज्ञानेश्वरी दिनेश घाटे या पंधरा दिवस आपला वकिली व्यवसाय सोडून शिकवत असतात. प्रसाद महाराज हे शिक्षक म्हणून मुलांना संस्कार शिकवत आहेत. पवन भोईर यांच्या माध्यमातून भजन शिकवण्याचे काम केले जात आहे.

**दरवर्षी आपल्याकडे बालसंस्कार शिबिर होत आहे. जो व्यक्ती आहे तो आयुष्यभरासाठी विद्यार्थी आहे. आयुष्य असेपर्यंत तो या जीवनात शिक्षण घेत असतो. आपल्या परिसरातील मुलांना आळंदीमध्ये जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही अशा मुलांसाठी बाळ संस्कार केंद्र उभारून हे शिक्षण आपल्या येथे दिले जात आहे.**

**-ज्ञानेश्वरी घाटे**

**अध्यात्मिक ज्ञानपीठ केंद्र जिते, कोल्हारे येथे सुरू आहे. तेरा वर्ष झाली हे बाल संस्कार केंद्र सुरू आहे. कीर्तन, हरिपाठ, ज्ञानेश्वरी, आध्यात्मिक गीता शिकवण्याचे काम येथे चालू आहे. आपला हिंदू धर्म वाढला पाहिजे यासाठी आम्ही अतोनात प्रयत्न करत आहोत.**

**-गणेश पाटील**

## 'स्मशानभूमीत सरणाच्या लाकडांची व्यवस्था करा'

**माथेरान : बातमीदार**

माथेरानच्या स्मशानभूमीतील लाकडांचा साठा सध्या जवळपास संपलेला असून काही दिवसांत पावसाळा सुरू होणार आहे. त्यामुळे आताच वन विभागाच्या सहकार्याने जंगलातील पडलेली वाळकी लाकडे जमा करून स्मशानभूमीतील गोडाऊन भरून ठेवावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. याबाबतचे निवेदन कोकणवासीय समाज संस्थेच्या वतीने मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षांना देण्यात आले.

दरवेळी स्थानिक नागरिक, समाजबांधव आणि काही सामाजिक कार्यकर्ते पुढे येत जंगल परिसरातील पडलेली लाकडे गोळा करून स्मशानभूमीत उपलब्ध करून देतात. या पार्श्वभूमीवर येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी लागणाऱ्या लाकडांची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी कोकणवासीय समाज संस्थेच्या वतीने महिला अध्यक्ष सारिका पाटील, वनिता दिघे, मनिषा शिंदे, गीता खाडे, समाज कार्यकारिणी सदस्य तथा नगरसेवक किशोर मोरे, केतन रामाणे आदी उपस्थित होते.

# माणगावच्या गीता तटकरे नर्सिंग कॉलेजमध्ये परिचारिका दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावातील श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग येथे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आरोग्य सेवेत अहोरात्र कार्यरत राहून मानवतेची सेवा करणाऱ्या परिचारिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाची सुरुवात माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व आधुनिक परिचारिका सेवांच्या जनक फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाला सदस्य डॉ. हेमंत गांधी, औदुंबर गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार अरुण पोवार, मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई शाळेच्या प्राचार्य निशिगंधा मयेकर, अशोकदादा साबळे विधी कॉलेजच्या प्राचार्य सोनाली बुर्टे, सुधाकर नारायण



शिपूरकर इंग्लिश मीडियम शाळेच्या प्राचार्य मनीषा मोरे तसेच द.ग. तटकरे कॉलेजचे प्राचार्य जयशंकर पांडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी विद्यार्थ्यांना परिचारिकांचे आरोग्य व्यवस्थेतील अमूल्य योगदान, रुग्णसेवेमधील त्यांचा त्याग, समर्पण आणि सेवाभाव याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. परिचारिका या केवळ आरोग्यसेवक नसून त्या रुग्णांसाठी आशेचा किरण असतात, असे प्रतिपादन उपस्थित मान्यवरांनी केले. विद्यार्थ्यांनीही विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रेरणादायी भाषणे आणि गीत सादर करून परिचारिका दिनाचे महत्त्व मांडले. त्यांच्या सादरीकरणातून परिचारिका व्यवसायातील मानवता, संवेदनशीलता व कर्तव्यनिष्ठेचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांसाठी पोस्टर निर्मिती स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली सर्जनशीलता आणि कौशल्य सादर केले. विजेत्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरवचिन्ह व बक्षिसे प्रदान करण्यात आली. प्राचार्य मेहरोश सनगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. सायली बक्कम, प्रा. रश्मी जाधव, स्वप्नील खाडे, वैभव पाटील आणि अनघा गमरे यांनी परिश्रम घेतले.

# पनवेलमधील आपटा बॉलीवूडचे आवडते रेल्वे स्टेशन!

**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई आणि आसपासच्या सर्व ठिकाणांपैकी पनवेल-रोहा मार्गावरील आपटा रेल्वे स्टेशन हे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसनंतर बॉलीवूडचे रेल्वे चित्रीकरणासाठी सर्वात पसंतीचे ठिकाण म्हणून उदयास आले आहे.

रायगड जिल्ह्यातील हिरव्यागार सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेले, डोंगर आणि पावसाळ्यात धबधब्यांनी वेढलेले आपटा स्टेशन, ग्रामीण आकर्षण आणि नैसर्गिक सौंदर्याचा एक अनोखा संगम सादर करते. स्टेशनची जुन्या पद्धतीची इमारत आणि त्याचे ऐतिहासिक आकर्षण एक अस्सल ग्रामीण रेल्वेचे वातावरण निर्माण करते, जे सेटवर साकारणे कठीण आहे आणि त्यामुळे १९७०-१९९०च्या काळातील चित्रपटांसाठी हे एक आदर्श ठिकाण ठरते.

मुंबईपासून फक्त ९० किमी आणि पनवेलपासून १८ किमी अंतरावर असल्यामुळे विशेषतः मुंबईस्थित प्रॉडक्शन हाऊसेससाठी येथे पोहचण्यासाठी आणि लॉजिस्टिक्सची सोय आहे. यापूर्वी आपटा येथे 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे', 'रंग दे बसंती', 'खाकी', 'बंटी और बबली', 'वन्स अपॉन अ टाइम इन मुंबई दोबारा', 'बाघी', 'बाजार', 'पीके', 'खाकी', 'शादी नं. १' यांसारख्या अनेक गाजलेल्या चित्रपटांचे चित्रिकरणाचे काम झाले आहे.

गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत मध्य रेल्वेवरील चित्रपट चित्रीकरणातून मिळणाऱ्या एकूण २.२९ कोटी रुपयांच्या महसुलात 'आपटा'च्या चित्रीकरणाने ८५.५५ लाख रुपयांचे योगदान दिले आहे, जे ३७%पेक्षा जास्त आहे.

सुप्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांनी नुकतेच आपटा येथे त्यांच्या 'फ्लिकर' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान आपटा स्टेशनशी असलेले त्यांचे नाते आणि शाहरूख खान व काजोल यांच्यासोबतच्या 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' या अजरामर चित्रपटातील लोकलमधील प्रतिष्ठित शेवटच्या दृश्याच्या चित्रीकरणाच्या आठवणींना उजाळा दिला. सोशल मीडियावर आपल्या आठवणी शेअर करताना ते म्हणाले की, ३२ वर्षांनंतर त्याच ठिकाणी उभे राहिल्यावर जणू वेळच थांबली आहे असे वाटले.

अजरामर बॉलीवूड क्लासिक्सपासून ते समकालीन वेब सिरीज आणि ब्लॉकबस्टर निर्मितीपर्यंत मध्य रेल्वेवरील ठिकाणे देशातील सर्वाधिक मागणी असलेल्या





चित्रपट चित्रीकरण स्थळांपैकी एक म्हणून सातत्याने ओळखली जातात. नयनरम्य रेल्वेस्थानके, वारसा वास्तुकला, निसर्गरम्य घाट, ग्रामीण भागातील निसर्गरम्य परिसर आणि कार्यरत रेल्वे याड्‌र्ससह, मध्य रेल्वे चित्रपट निर्मात्यांना वास्तववाद, नॉस्टॅल्जिया आणि भव्यता यांचा संगम साधणारा एक अनोखा सिनेमॅटिक कॅनव्हास उपलब्ध करून देते.

मध्य रेल्वेची स्थानके आणि परिसर हे रेल्वे, स्थानके, रेल्वे परिसर इत्यादी दृश्यांच्या बहुतांश बाह्य चित्रपट चित्रीकरणाचे केंद्र राहिले आहेत.

भव्य छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, जे युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे, हे चित्रीकरणासाठी सर्वाधिक पसंतीच्या ठिकाणांपैकी एक आहे. येथे 'स्लमडॉग मिलियनेअर' (गाणे-जय हो), 'रब ने बना दी जोडी', 'चेन्नई एक्सप्रेस', 'स्टोनमॅन', 'डर', 'द लंच बॉक्स', 'द ट्रेन' (मल्याळम चित्रपट) यांसारखे लोकप्रिय चित्रपट आणि आयपीएल, सनफीस्ट इत्यादींसह अनेक टीव्ही जाहिरातींचे चित्रीकरण झाले आहे.

सुपरस्टार अमिताभ बच्चन यांनीही मध्य रेल्वेच्या अंतर्गत निर्मिती असलेल्या 'एक सफर रेल के साथ' या चित्रपटासाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या या वारसा इमारतीत चित्रीकरण केले होते.

वाडी बंदर यार्डसारख्या ठिकाणी 'कमिनेय' (१५ दिवस चित्रीकरण), 'जब वी मेट' आणि हिट वेब सिरीज 'सॅक्रेड गेम्स' सह इतर चित्रपटांचे सेट उभारण्यासाठी उत्तम जागा मिळाली, तर चौक स्टेशन आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसराने सलमान खानच्या 'दबंग' चित्रपटाच्या चित्रीकरणाला पूर्ण न्याय दिला. दादर, शीव, पनवेल, कॉटन ग्रीन, सानपाडा इत्यादी स्थानकांवर 'लाइफ इन अ मेट्रो', 'भावेश जोशी', 'डोंबिवली फास्ट', 'दरबार' इत्यादी चित्रपटांसाठी उपनगरीय स्थानके आणि लोकलमध्ये चित्रीकरणाची संधी मिळाली.

रजनीकांत प्रमुख भूमिका असलेला 'रोबोट', अभिषेक बच्चन प्रमुख भूमिका असलेला 'रावण', करीना कपूर प्रमुख भूमिका असलेला 'जब वी मेट' इत्यादी सुपरहिट चित्रपटांचे चित्रीकरण पुणे आणि लोणावळा स्थानकांवर झाले आहे, तर अलीकडील हिट चित्रपट 'लापता लेडीज'चे चित्रीकरण पुणे विभागातील बेलापूर, येवला आणि कान्हेगाव स्थानकांवर झाले. या तीन स्थानकांनी कथेला साजेसे असे ग्रामीण पार्श्वभूमीतील रेल्वेस्थानकांचे अनोखे लोकेशन उपलब्ध करून दिले.

पुणे विभागातील सातारा जिल्ह्यातील वाठार स्थानकावर अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे, ज्यात 'गुंडे' या चित्रपटाचा समावेश आहे, ज्यासाठी जुन्या प्रकारच्या रेल्वेगाड्या आणि इंजिनांसह जुन्या पश्चिम बंगालच्या परिसराची पार्श्वभूमी आवश्यक होती. सातारा स्थानकावरही अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे.

नेरळ, माथेरान, लोणावळा, खंडाळा इत्यादी ठिकाणे त्यांच्या निसर्गरम्य सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत, जे अनेक चित्रपटांमध्ये दाखवण्यात आले आहे.

नागपूर विभागातील चंद्रपूर स्टेशन आणि लगतच्या कोळसा खाण क्षेत्रांचा उपयोग संबंधित थीम/कथेवर आधारित अनेक चित्रपट आणि मालिकांच्या चित्रीकरणासाठीही करण्यात आला आहे. मध्य रेल्वेने गेल्या तीन वर्षांत जवळपास ३० चित्रपट आणि मालिकांच्या चित्रीकरणातून २.२९ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला आहे. यामध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४मध्ये ९४.४५ लाख रुपये, आर्थिक वर्ष २०२४-२५मध्ये ४०.१३ लाख रुपये आणि आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये ९४.६२ लाख रुपयांचा समावेश आहे.

मध्य रेल्वेकडे चित्रपट चित्रीकरणासाठीच्या अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी एक समर्पित जनसंपर्क कक्ष आहे आणि परवानगी देण्यासाठी एक सुव्यवस्थित एक-खिडकी प्रणाली आहे. सुरक्षा मानके, विहित शुल्काचा भरणा आणि ब्लॉक्सची उपलब्धता या अटींच्या अधीन राहून परवानगी दिली जाते.

मध्य रेल्वे निर्मिती संस्थांना सर्व सुरक्षा आणि संरक्षणात्मक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, अस्सल बाह्य चित्रीकरण स्थळांसाठी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, आपटा, पनवेल, चौक, नेरळ, माथेरान, लोणावळा, खंडाळा, वाठार, सातारा यांसारख्या स्थानकांचा आणि निर्मिती संस्थांच्या गरजेनुसार इतर ठिकाणांचा शोध घेण्यासाठी आमंत्रित करत आहे.


























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com